
# रुद्राक्ष यात्रा




— सद्‌गुरु प्रभू



सद्‌गुरु प्रभू आणि गुं. फ. आजगांवकर

आनंदनाथ महाराजकृत -

**स्वामी समर्थ स्तवनगाथा** (पृष्ठे ६००) कि. २१० रु.

भारितातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास डॉ. प्रभू किं १२५ रु.

**प्राचीन मराठी संतकवि** ले. ज. र. आजगांवकर

भाग २ व ३ (पृष्ठे १०००) किं. १२० रु.

**श्री. पद्मानाभतीर्थ स्वामी व स्वामी समर्थ परंपरा**

**स्तोत्रे, संतचरित्रे, दत्तसांप्रदाईकांना अत्यंत उपयुक्त.** किं ६० रु.

**'हे भगवन'**

सद्‌गुरुप्रभू यांचा हा काव्य संग्रह

डॉ. व. दि. कुलकर्णी आणि कवि कुसुमाग्रज यांनी वाखाणलेला आहे.

# रुद्राक्ष यात्रा

: लेखक :

सद्गुरू प्रभू

संपादन :-

गुं. फ. आजगांवकर

प्रबोधन रिसर्च असोशिएट्स,

मुंबई ४०० ००४.

प्रकाशक : गुं. फ. आजगांवकर,
१७, के. जी. बी. निवास,
गिरगांव,
मुंबई ४०० ००४.
फोन : ३८८ १२ १७

ब्लॉक : अशोक नेरकर
युनिक ब्लॉक,
संनमिल कंपाऊन्ड, परेल
यांच्या सौजन्याने.

लेखक : सद्‌गुरू प्रभू
'औदुंबर' पांडुरंग वाडी,
डोंबिवली ईस्ट,
४२१ २०१

प्रती : १०० पांचशें

किमत : २० रुपये.

सर्वहक्क प्रकाशकाधीन

मुद्रक : मायक्रोग्राफ,
जे. एस. एस. रोड,
दादी संतुक लेन,
मुंबई ४०० ००२.
फोन २०८३०८१.

## रुद्राक्षयात्रा

*ही यात्रा अखंड सुरू राहणार. अनंत जन्माची. चालू जीवन हा एक टप्पा.*

*विद्यमान यात्रेंत पूर्वार्धांत वा उत्तरार्धांत अनेक सहप्रवासी सामील झाले आहेत. कुटुंबांतील व बाहेरचे! त्या सर्वांचा नामोच्चार न करतां यात्रा सुखावह व्हावी अशी ईशचरणीं प्रार्थना.*

- सद्गुरु प्रभू

## सादर समर्पण

माझी आई व

माझे थोरले बंधु श्री. गुं. फ. आजगांवकर

यांचे चरणीं

'रुद्राक्ष यात्रा'

ग्रंथ अर्पण

–सद्गुरू प्रभु–


## देव डोंगरीं राहतो -
## यात्रा देवाची पाहतो!

संसाराच्या ऐलतीरावरून पैलतीराचा समर्थ. वेध घेणें हें जीवनाचें लेणें आहे. जी गतीमान चाल अविचल व सन्मार्गी असते तिलाच यात्रा म्हणतात. अशा प्रकारच्या जीवन यात्रेची वाटचाल करणारे सज्जन थोडेच असतात. पवित्र जीवन यात्रेच्या मार्गांत ज्ञानचक्षू अभिप्रेत असतो. त्याठिकाणीं दिव्य दृष्टिचें कैलास लेणें लागतें. सत्‌ज्ञान हा तृतीय नेत्र म्हटलेला आहे. तोच एकमेव शक्तीचा 'एकमुखी रुद्र' होय. त्याच्या मुखांतून सत्य-शीव-सुंदर यांचें प्रकटीकरण होत असतें. तें मानवी जीवन म्हणजेच एक मुखी रुद्राक्ष आहे. माझे गुरुवर्य श्री. स. फ. आजगांवकर (सद्‌गुरु प्रभु) यांनी लिहिलेल्या रुद्राक्ष यात्रेचे त्यांचा एक सहप्रवासी म्हणून मला दिसत असलेल्या अंतरंगाचें दर्शन घेऊन 'रुद्राक्ष वाटचाल' अशीच चालू राहील याची खात्री वाटते. -शुभं भवतु -

श्री. बाळ धारप

भगवत् भक्त

*रिटायर्ड ॲडिशनल कलेक्टर रायगड.*



वृक्ष हे ऋषी आहेत.




नरसिंह सरस्वती



कृष्णाबाई कृष्णाकाठी

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | रुद्राक्षयात्रा | १ |
| २ | माझें नांव कृष्णाबाई | ९ |
| ३ | गोमंतकांत | १५ |
| ४ | माझा भाऊ दौलत | २५ |
| ५ | प्रश्नोत्तरें | २७ |
| ६ | कृष्णाकांठीं | ३१ |
| ७ | लेखननिर्मिती | ३५ |
| ८ | साधुसंतांच्या भेटी | ३९ |
| ९ | नामस्मरणाचें महत्त्व | ५१ |



कृष्णेचा घाट

# रुद्राक्षयात्रा

माझा थोरला भाऊ दौलत.

पांच वर्षांनंतर माझा जन्म!

अशीच एक अमावास्या!

अशीच एक रात्र!

बाहेर व खोलींत कीर्ऽऽ काळोख!

अतिशय भयाण....

जवळच्या स्मशानभूमींत जर आगीचा जाळ असता तर....!

प्रेताची भीति वाटली नसती; कारण त्या काळोखाला प्रकाशाची जोड तरी मिळाली असती. माझ्या आईला त्या प्रकाशाचीच नित्याची सोबत होती. कारण घरांत दिवा असला तरी तेल नव्हतें सर्व डबे रिकामे! मूर्तिमंत दारिद्र्य हात धुऊन पाठीमागें लागलें होतें, आईच्या व वडिलांच्या!

आईचें मन अंधार व समुद्राचा घोंगावणारा आवाज यांत बुडून गेलें होतें.

अशा वेळीं रात्रौ १२।। वाजतां मी जन्मलों.... अंधाराची गोधडी लपेटून!

अंधारांतून प्रकाशाकडे माझी वाटचाल होती काय?......

कीं अंधारच जन्मला होता माझ्या रूपानें?

आतां थोड्याच वेळानें पहांट फुटणार होती. सीमारेषेवर मी जन्माला आलों होतों. कोणती सीमारेषा होती ती?

अंधार-प्रकाश कीं प्रकाश-अंधार?

'सुख–दुःख' कीं 'दुःख–सुख'।

'वसंत-ग्रीष्म' की 'ग्रीष्म–वसंत'–?

कोणती सीमारेषा होती ती? कोणती?

.... कोणती? .....कोणती?

हां हां म्हणतां पहांट झाली.

शेजारच्या बाया यावयास लागल्या. अभिप्रायांची कुजबूज

अमावास्येचा पोर....! कुणाला तरी घरांतील कर्त्याला मारणार! नाहींतर आपण मरणार! येतांना पावलांचा हळुवार आवाज जातांना नांव ठेवून जाई..... जुनाट बुरसटलेल्या समज-गैरसमजाची आंठी कपाळावर आंखून बाया खोलींतून बाहेर पडत होत्या. ८' × १०' ची एक छोटी खोली .... आठ आणे भाडें दरमहाचें.

मला यांतील कांहींच कळत नव्हतें. भाषा अवगत नव्हती. अर्थ समजत नव्हता. पुढील आयुष्यांत जें कळलें तें टिपलें. जन्म-मृत्यु म्हणजे काय तें कळत नव्हतें. केवळ मी मांसाचा गोळा होतों काय? माझ्यांत चैतन्य नव्हतें काय?

छे!..... छे!..... छे!.....

माझ्या रूपानें एक प्रश्नचिन्ह होतें तें. विश्वातील अनेक प्रश्न-चिन्हांपैकीं माझा जन्म म्हणजे एक वेदना होती ती!... विश्वाच्या अंतापर्यंत चालणारी... कधीं माझ्या जन्माच्या रूपानें तर कधीं अन्य जीवांच्या मृत्यूच्या!

आतां माझा नामकरणविधी होता.

गांवाहून पत्र आलें. आजोबांनी 'सद्गुरु' नांव ठेवण्याबद्दल अगत्यपूर्वक सूचना केली होती. आजोबा साक्षर नव्हते. मग ते पत्र तरी लिहिणार कसे? अर्थात पांचदहा वर्षांनी त्यांना स्फूर्ति झाली कीं कुणाकडे तरी जात व मजकूर सांगत. त्याच पार्श्वभूमीवर माझ्या वडिलांना आलेले पत्र म्हणजे माझ्या जीवनांतील दस्तऐवजच बनून राहिलें होतें.

गांवांतील जमीन कुळाकडून कसवून घेणें व तें कूळ न बदलणें हें त्यांचें प्रमुख काम. कोणत्याहि कुळाकडून त्याच्या कुवतीप्रमाणें काम करून घेण्यांत त्यांचा हातखंडा होता. माडाचें पाडप, लांकडें तोडून घेणें, गुरांची राखणदारी करून घेणें वगैरे कामें त्यांना ते सांगत असत. वर्षांतून घर शिवण्याचें कामहि हींच कुळें करीत असत.

आजोबांना घरबसल्या कुळांकडून भाताच्या, व काजूच्या, आणि नाचणीच्या रूपानें खंड मिळे. त्यांतूनच ते मिरची, मासे वगैरे विकत घेत. बारा मुलें, पत्नी (आजी) व ते मिळून १४ माणसें एका कुटुंबांत असावयाची. दोन आण्यांच्या पेडव्यांत अगर बांगड्यांत ते सबंध

दिवसाचें कालवण (तेही मोठ्या मातीच्या कुणल्यांत) करून ठेवावयास सांगत. त्यांना आंबट तिखट आमटी आवडत असे. त्या कालवणा-शिवाय त्यांचा एकही दिवस जात नसे. त्यांचें अर्थशास्त्र त्या आमटीत होतें. सकाळी बिनदुधाचा चहा ते स्वतः घेत व इतरांस हवा असल्यास तसा चहा घ्यावा असा त्यांचा आग्रह असे. त्यांचें जीवन स्वयंपूर्ण व स्वावलंबी झालें होतें. त्यांची देवभक्ति सुद्धा तशीच. दत्तजन्मापूर्वी गुरुचरित्रपारायण व्हावें असें त्यांना वाटे. मात्र योग्य पुरोहित भेटला नाहीं तर ते गुरुचरित्र पोथी औदुंबराच्या मुळाशीं चौरंगावर ठेवत असत. कोणत्याही रुढीला घट्ट मिठी मारून ते राहिले नाहीत. रात्रौ तेलाचा (दिव्यासाठी) प्रश्नच नव्हता. देवाला दिवा लावला की संध्याकाळचें भोजन दिवेलागणीपूर्वीच आटोपून रात्रौ ७ ते ८ पर्यंत सर्वांनी झोपावयाचें असा दंडक होता. आजोबांचे नांव 'वासुदेव' होतें. भल्या पहाटेस ते उठत असत. पाण्याची चूळ भरून टाकत. एकतारीवर तुकाराममहाराजांचे अभंग म्हणत. एक दिवस ग्रामदेव वेतोबा मंदिरापुढें ढाकोऱ्यास जातांना वझराच्या उजवीकडे जाणाऱ्या रस्त्यावर त्यांची व टेंबेस्वामींची भेट झाली होती. घराण्यांतील दत्तोपासना पुढें सुरू राहील असें टेंबेस्वामींनी त्यांना सांगितलें होतें. असो. बाऱ दिवसांपूर्वी जन्मलेली वेदना 'सद्गुरु' रूप झाली. नंतर आजोबांचें पत्र केव्हां. आलें नाहीं. फक्त मी मॅट्रिकच्या वर्गांत असतांना सावंतवाडीस त कोर्टाच्या कामाला आले असतांना १९४२-४३ सालीं भेट झाली. त्यावेळ टेंबेस्वामींची आठवण त्यांनी मला सांगितली.

माझा अमावास्येचा जन्म हळू हळू खरा होत असावा अशी परिस्थिती मी आईच्या पोटांत असल्यापासूनच निर्माण झाली होती. फक्त आईला ती उशिरा समजली. आर्थिक परिस्थिति गंभीर होऊं लागली. कारण माझ्या वडिलांची नोकरी गेली होती. पूर्वीच दाटून आलेल्या अंधाराच्या पोटांत दारिद्र्याची सुरी फिरूं लागली. गाववाल्या एका कोंकण्यानें ... मळगांवच्या त्यांच्या मित्रानें आपणाला जागा हवी म्हणून मालकाचें मन बिथरवून वडिलांना दुकानावरून दूर केलें. ही बातमी ऐकून माझी आई मनानें कोसळली.

भल्या पहाटे ती राममंदिरात जावयाची व सकाळ होण्यापूर्वी परतावयाची. कारण लुगडें जुनें होतें. तेंही ठिगळांचें होतें.

एक दिवस सकाळी ती उठली तीच मोठ्या उत्साहानें. वडिलांना

ती म्हणाली – 'ऐकतां काय?' ....

'काय.....'

'मुंबई सोडून जाणें बरें वाटते....'

'कुठे जाणार?' ....... बाबा

'देव बुद्धि देईल तेथे.' आई

''देव कोठें आहे? सर्व धनिकांनी बिचाऱ्या देवाला आपापल्या देव्हांऱ्यात बंदिस्त करून टाकलें आहे. मंदिरांतील देवांना पुजाऱ्यांनी आपल्या ताब्यात ठेवलें आहे. गरिबांच्या झोपडींत देव कसा येतो? मी तुझा देव आहे, प्रत्येक विवाहित स्त्रीचा देव म्हणजे तिचा नवरा हे ध्यानी ठेव. खरें सांगावयाचें तर देवाची निर्मिती भीतींतून झालेली आहे. सामाजिक सेवा हीच खरी ईश्वरी सेवा. जात, धर्म, राष्ट्र, श्रेष्ठ, कनिष्ठ यांच्या भिंती गाडून टाकल्या पाहिजेत. आपणांस आपली मर्यादा ओळखावी लागेल व या कामांत जे पुढाकार घेतील अशा लोकांना आपण साहाय्य केले पाहिजे. प्रत्येक व्यक्ती, चराचर परमात्मामय आहे. अनेक व्यक्तींचा संबंध म्हणजे समाज होय. अनेकांतील चिरंतन तत्त्व जें संपूर्ण विश्वात भरून उरलें आहे ते म्हणजे चैतन्य. मनुष्य वृक्षवेली, चतुष्पाद प्राणी, विविध पक्षी असे वेगवेगळे समाज दिसत असले तरी या सर्वांतील 'व्यक्त-अव्यक्त' चैतन्य आपण समजून घेतलें पाहिजे. तीच देवाची पूजा होय.'' .... बाबा

'आजपासून माझ्या नित्याच्या कार्यक्रमाला तुमच्या मार्गदर्शनाची जोड देईन.' .... आई

मुंबई सोडण्याच्या संदर्भांत पुन्हा आईनें विचारलें, 'जावयाचे केव्हा?'

'कुठे जाणार?' ... बाबांचा तोच प्रश्न

'देव बुद्धी देईल तेथें.' आईनें पूर्वीचेंच उत्तर दिलें.

'बुद्धीवर माझा विश्वास आहे, पण प्रश्न आहे तो पैशांचा! कसा तयार करतां येईल तो?'' बाबा

'भांडी विकू' ... आई

'तर मग इथला सर्व व्यवहार आटोपता घेण्यासाठीं असलेले सर्व विकून टाकणें हाच पर्याय आहे..... माझा निर्णय पक्का झाला, पण मी कोणत्याही तीर्थक्षेत्रावर येणार नाही. फक्त तुला पोहोचवावयास येईन व दुसऱ्या दिवशी निघून जाईन. आहे कबुली?...'

'देव बुद्धी देईल तसे वागा' .... आई.

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

एकदा तुला देवाबद्दलचं मत सांगितलं आहे, दोन गोष्टी ठरल्य आहेत. जन्म व मृत्यु यांत देव कोणताच बदल करू शकत नाहीं जन्माला आलों म्हणजे पन्नास टक्के काम झालें. तें काम झालं आहे आतां मृत्यु आला, म्हणजे राहिलेले पन्नास टक्के काम होईल. य पलीकडे काही नाही. जन्म व मृत्यु यांत वेदना इकडून तिकडे फिरत असते. केव्हां नागमोडी तर केव्हा सरळ. मग ती परिस्थितीजन्य असेल किवा आपल्या कर्मांतून निर्माण झाली असेल. ती वेगवेगळ्या स्वरूपांत सर्वांनाच हताश करते. असें होत असतांना क्षणिक सुखाचा भास होतो. या ठिकाणीं देवाचा काय संबंध? मनुष्य काय अगर अन्य प्राणी काय, संपला कीं सर्व संपलं. पुनर्जन्म वगैरे कांहीच नाहीं. आपण समज-गैरसमजाचें जाळे विणीत असतों. त्यांतूनच देव, दैव, पुनर्जन्म, प्रारब्ध वगैरे अपसमज निर्माण होतात. व्यवहारचतुर माणसांनी या गैरसमजांतून विविध दृष्टांताचा मीठमसाला लावून आपल्या स्वार्थाची पोळी भाजून घेतली आहे'.

'पण मी तीर्थक्षेत्रावर जाणार असें केव्हां म्हटलें?.....' आई

'मग जावयाचे कोठें?...' बाबा

'दत्तमहाराज योग्य ठिकाणी नेणार. त्यांनी मला सांगितले आहे. मुंबई सोडण्याविषयी व पुढील व्यवस्था आपण पाहीन असे म्हणाले.----' आई

'म्हणून मुंबई सोडावयाची?'

'स्वप्ने ही आपल्या मनाचे खेळ असतात. झोपल्यानंतर आपल्य सुप्त मनांतून विविध प्रकारच्या प्रतिमा बाहेर पडत असतात जागृतावस्थेत असलेल्या आपल्या विचाराशी त्या प्रतिमा संबंधित असतात. त्या सलग व क्रमबद्ध होत व्यक्त होऊं लागल्या (झोंपेत की त्याचीच स्वप्नें बनतात. मनी वसे ते स्वप्नी दिसे हे माहीत न तुला?'..... बाबा

'माझी श्रद्धा दत्तमहाराजांवर आहे. तुमचा निघण्याचा निश्चय करा म्हणजे झालं.'.... आई

'तसं असेल तर उद्यां निघू....' बाबा

मार्गशीर्ष दशमीला आम्हा सर्वांना घेऊन ट्रेनमध्ये बाबा बसले. कुठें जावें हें ठरलेलें नसतांना! ट्रेन पुण्याच्या दिशेनें धावू लागली. जन्मसमयीं कोणत्या ग्रहावर आपला जन्म होणार हे कुणाला ठाऊक असतें? अवकाशांत अनंत ग्रह असतांना या पृथ्वीवरच जन्म कां घ्यावा
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

लागला? कोणी ठरविलें होतें? सर्वांचा प्रवास असाच अनिश्चिततेने चाललेला असतो. आमचा प्रवास असाच कांहीसा होता.

'हें बघा पुणे स्टेशन....'

तांबडे डगले घातलेले हमाल सामान नेण्यासाठी गाडीच्या प्रत्येक दरवाजाच्या दिशेने धांवत येत आहेत. आमचें सामान आम्ही पूर्वीच निकालांत काढलें होतें. पाण्याचा एक तांब्या सोडला तर आमच्याकडे कपड्यांच्या एकदोन छोट्या पिशव्या!

पुणें-बेळगांव ट्रेन स्टेशनवर तयार होती. बाबांना आम्हांस आजगांवी न्यावयाचे होते. बेळगांवहून सावंतवाडी गाडीनें त्या काळांत कोकणांत जावयाचे, पांच मिनिटांनी गाडी सुटावयाची होती; पण गर्दी मरणाची! गाडींत प्रवेश मिळण्यासाठीं एकच झुंबड. गाडींतील प्रवासी गाडींत प्रवेश करणाऱ्या नवीन लोकांना बाहेर ढकलत असत. तेवढ्यांतच एका हमालाने आमची चौकशी करून प्रथम आम्हां दोघा मुलांना व मागाहून आईबाबांना गाडींत आणून बसविलें. ज्या डब्यांत आम्ही बसलों तो डबा बेळगांव ऐवजी कोल्हापूरचा होता व मिरजेला कोल्हापूर गाडीला तो जोडला जावयाचा होता याची बाबांना तेव्हां कल्पना नव्हती. बेळगांवमार्गे घरी कोकणांत जावयाचें या दृष्टीने त्यांचें विचारचक्र सुरू होतें. चार जीव एकमेकांना बिलगून बसले तरी पुढील आयुष्यांत चारांचे, चार भिन्न मार्ग होतात. नोकरीच्या निमित्ताने अगर अन्य कारणानें म्हणा भिन्न दिशेनें जाणारे जीवनप्रवाह आज तरी एकमेकांच्या सुखदु:खात विलीन होऊन गेले होते. मिरजेला दोन डबे स्वतंत्र करण्यांत येऊन कोल्हापूर गाडीला जोडले गेले. आपण कोल्हापूरच्या दिशेने जात आहोत याची कल्पना बाबांना आली. मिरजेला तर थंडीचा कडाका जाणवत होता. 'चाय गरम'च्या पुकाराने पोरं इकडून तिकडे चहाच्या किटल्या घेऊन फिरत होती - धावत होती. आईने चहा घेतला नाही. बाबांनी मात्र गरम चहाचा कप तोंडी लावला व चहा पिऊन झाल्यावर एक विडी शिलगाविली. बाबा चहाचे व विडीचे मनापासून चहाते होते. स्नान होण्यापूर्वी काही खावयाचे नाही अगर पाणीसुद्धा प्यावयाचे नाहीं असा आईचा शिरस्ता होता. ती थोडी कर्मठ होती म्हणा ना!

पहाट फुटत असतांना गाडी कोल्हापूर स्टेशनला आली. पुन्हा हमालांची धावाधाव सुरू झाली. कोल्हापूरहून सावंतवाडीस जाणारी गाडी ब्रेकडाऊन होती. आधारासाठी कोकणांत जाणे हा पर्याय होता. तेवढ्यांत

'वाडी' 'वाडी' म्हणून ओरडणारी दोन मुले प्रवासीलोकांच्या दिशेने धावू लागली. मधून मधून भगवे ध्वज लावलेल्या खाजगी गाड्या भर वेगाने 'दिगंबरा-दिगंबरा' या तालबद्ध व गगनभेदी आवाजांत विशिष्ट लयीनें नरसिहवाडीच्या दिशेनें जात होत्या, इतक्यांत धावत धावत एक क्लीनर बाबांकडे आला व म्हणाला, 'दत्तवाडीस जात असाल तर आमच्या गाडीत बसा.' असें म्हणत असतांना गाडीच्या दिशेने बाबांचा हात तो ओढू लागला. अर्थात त्याचा आग्रह बाबांना मोडवेना. ते आईबरोबर हळू आवाजात थोडे बोलले व त्या क्लीनरने दाखविलेल्या गाडीत बसले. स्थानिक पाच प्रवासी व आम्ही चार मिळून एकूण नऊ माणसें जमा होतांच ड्रायव्हरनें गाडी सोडली व ती दत्तवाडीच्या दिशेनें धावूं लागली.

'दिगंबरा, दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबरा!' ड्रायव्हर स्वतःशीच गुणगुणत होता. 'आज दत्तजन्म!' ड्रायव्हर म्हणाला.

'कृष्णा नदीच्या पात्रावर आज यात्रेकरूंचा प्रचंड जमाव असेल. महाराजांचा आज जन्मदिवस. फार फार जागृत देवस्थान आहे. गरीब श्रीमंत असा भेद नाही. माधुकरीचें भोजन तर वर्षभर गरीब उपासकांना मिळतें. नवस केलेले, श्रीमंत लोकसुद्धां माधुकरी मागतात.'

'क्षेत्रावर गेल्यावर फार फार समाधान लाभतें.' तो पुढे म्हणाला.

'आपण गाडीवर केव्हांपासून काम करतां?'.... बाबा

'पंचवीस वर्षांपासून.' तो म्हणाला.

'मालक पगार काय देतो?'..... बाबा.

'मीच मालक. माझी ही जुनी गाडी. आता माझ्या नवीन चार गाड्या आहेत. 'बेळगांव आजरा' या ठिकाणी माझ्या गाड्या नियमित जात-येत असतात. विशेष प्रसंगी माझी जुनी गाडी घेऊन मी फिरतों. या गाडीत बसणाऱ्या कोणत्याही प्रवाशाला भाडे द्यावे लागत नाही. म्हणूनच जागा असतांना गिऱ्हाईकाची वाट न पाहतां निघालो. केव्हा केव्हा तीर्थक्षेत्रावर जाणे घडते. महाराजांच्या इच्छेनुसार आजच्या सारखा प्रवास घडतो ...' ड्रायव्हर

'महाराज आपल्या बरोबर बोलतात का?.....' बाबा

'प्रत्यक्ष नाही, पण स्वप्नांत सांगतात. अगर अन्य तऱ्हेने त्यांना भेटण्यासाठी मन व्याकुळतें.....' ड्रायव्हर

'आज दत्तवाडीस जाणे कसें काय घडलें?' .... बाबा.

'पहाटेला पडलेले स्वप्न. ट्रेन येण्यापूर्वी स्टेशनवर थांब. ट्रेन

आल्यावर १५ मिनिटांनी माझ्याकडे येण्यासाठी नीघ, हा आवाज ऐकून खडबडून जागा झालों. स्टेशनवर गाडी येण्यापूर्वी पोहोचलेंच पाहिजे; म्हणून सर्व कामें घाईघाईने आटोपून स्नान केलें व निघालो. येऊन पोहोचलों तर गाडी येथे नुकतीच स्टेशनवर पोहाचत होती. गाडीवरच्या मुलाला दत्तवाडी, दत्तवाडी म्हणून ओरड असें सांगितलें व मी पंधरा मिनिटें थांबावयाचें ठरविलें.'

'आपलें नांव!' .....बाबा.

'मयेकर'. मूळचे आम्हीं गोव्याचे.

'दत्तवाडीस गाडी केव्हा पोहोचेल?' .... बाबा

'दोन तास लागतील.' ..... तो

'गाडी बनांत थांबेल. तेथून दत्तमहाराजांच्या पादुका हाकेच्या अंतरावर आहेत. कृष्णा नदीचे पाणी संथ वहात असते. पंचगंगा कृष्णा संगम तेथेच आहे. मी महाराजांचे दर्शन घेऊन लगेच निघेन'.... तो

गाडीचा मालक श्रद्धावान होता. नरसोबाच्या वाडीची प्राथमिक माहिती आईला कळली. इतकेच नव्हे तर महाराजांनी येथे मला आणून पोहचवले. मुंबईतील स्वप्नाचा तिला प्रत्यय आला. गाडीच्या मालकाला पडलेले स्वप्न व कोल्हापूर ते नरसोबावाडीचा मोफतचा प्रवास जणू ठरल्याप्रमाणेच झाला हे पाहून आईच्या श्रद्धेचा व निश्चयाचा प्रत्यय बाबांना सुद्धा आला असावा. मात्र त्यांनी ते बोलून दाखविले नाही.

हां हां म्हणतां गाडी बनांत आली. गाडीसभोवार बरेच पुजारी धावत आले. आपल्या घरी यात्रेकरूंनी यावें असें, प्रत्येकाला वाटत होतें. श्री दत्तगुरु कोणाच्या रूपाने आपल्या घरीं येतील हें सांगणें कठीण. कारण असा चमत्कार अनेक वेळां घडत असे. प्रत्येक पुजाऱ्याचा तसा भाव असे.

'आपण प्रथम पादुकाकडे जाऊ. दर्शनापूर्वी कृष्णा नदीच्या पात्रांतील पाण्यानें मी स्नान करीन. माझ्याकडे पाण्याचा तांब्या आहे. तोपर्यंत सद्गुरु व दौलतकडे जरा लक्ष द्या'..... आई.

आम्ही निघालों व घाटावर येऊन पोहोचलों. घाटाच्या एका बाजूने पुरुष स्नान आटोपत होते. काही पोहणारे तरुण घाटावरील पश्चिम तीरावरून पलीकडे असलेल्या ओरवाडीकडे तीरासारखे पाण्यात सूर मारून परत पोहून येत.... आईला रुद्राक्षांची माळ धारण केलेल्या एका तेजस्वी व्यक्तीचें दर्शन याच ठिकाणीं प्रथम घडलें.

■ □ ■ □ ■

# माझें नांव कृष्णाबाई

## सहकार, चमत्कार कीं साक्षात्कार?

'काशिबाई, इकडे या.' कृष्णाबाई म्हणाल्या.

'माझें नांव आपणांस कसें समजलें?'... आईनें विचारलें.

'तें मागाहून सांगेन.'... कृष्णाबाई

'तुमच्याकडे येऊन काय करूं?' .... आई

'तुम्हाला स्नानाला पाणी देते.'

'मी करेन ना!'

'माझ्याकडे तांब्या द्या. पाण्यातील पायरीवर उतरूं नका. ... येथें शेवाळ आहे. पाय घसरून पाण्यांत जाल.' .... कृष्णाबाई

'कृष्णाप्रवाहांत पडलें तर काय बिघडलें?' .... आई

'कृष्णाकाठावर रहा. तुमची मुलें वरून खाली पहात आहेत. त्यांचा आधार तुम्ही आहांत?....' कृष्णाबाई.

'मी आधार नव्हे. दत्तमहाराज आधार आहेत.' .... आई

'खरें आहे तुमचें. कृष्णा पंचगंगा क्षेत्र म्हणजेच श्री दत्तमहाराजांची राजधानी! काशिबाई, या पंचगंगा कृष्णा संगमालाच दक्षिणेचें प्रयागतीर्थ म्हणतात. भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारें हें पवित्र स्थान. पूर्वी बाभळी, शमी, पिंपळ, औदुंबर व जंगली वनस्पतींनीं गच्च झाकलेलें हे गांव...'

'आपण किती वर्षें इथें आहात?'.. आईनें विचारलें.

'मला वर्षें सांगता येणार नाहीत. नरसोबाच्या आगमनापूर्वींपासून मी येथें आहे. ही कृष्णा पूर्वी वेगाने वहात होती. सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्रौ घनदाट काळोखांतून धांवत होती. कोठून तरी नरसोबा आले. त्यांच्या तेजाने कृष्णाबाईचे हृदय प्रकाशमान झालें व

यांच्याकडे पहात असतांना कृष्णा नदीचा वेग मंदावला. लोक म्हणू लागले 'संथ वाहते कृष्णामाई'... कृष्णा.

'हे नरसोबा कोण?' .... आई

'श्री दत्तगुरूंचा दुसरा अवतार. पहिला अवतार श्रीपाद श्रीवल्लभ असून दुसरा अवतार नरसोबा महाराज, तिसरे अवतार अक्कलकोटचे स्वामी समर्थ. नरसोबांच्या नावावरून 'नरसोबावाडी' हे नांव या गावाला मिळालें.'

कृष्णाबाई पुढे म्हणाल्या, 'कृष्णा नदींत शक्तितीर्थ, शुक्लतीर्थ, पापविनाशीतीर्थ, काम्यतीर्थ, वरद्तीर्थ, प्रयागतीर्थ, अमरतीर्थ, कोटीतीर्थ, अशी सात तीर्थे आहेत. कृष्णा दक्षिणवाहिनी असून पूर्वेच्या बाजूने पंचगंगा वहात येऊन दक्षिणभागीं कृष्णेला मिळते. पंचगंगेच्या पलीकडील तीरावर कुरवपूर म्हणजे कुरुंदवाड गांव व कृष्णेच्या पलीकडे पूर्वतीरावर अमरापूर (ओरवाड) आहे. ... कृष्णा

'तुझें वय अधिक असून तूं लहान कशी दिसतेस?' .....आई

'तें न विचारणें बरें!' - कृष्णा.

'का?....' आई

'माझ्यावर बंधन आहे'... कृष्णा.

'माझें नांव काशी कसे कळलें?' आई

'केव्हां तरी सांगेन.' कृष्णा.

'तुला महाराजांच्या नित्यधार्मिक कार्याची माहिती असेलच!' .... आई.

'होय ना.... पण ती नंतर सांगेन.' प्रथम तुझ्या मुलांना स्नानासाठी इकडे घेऊन ये...!' कृष्णा-

कृष्णाबाईनीं दोन्ही मुलांना स्नान घालून झाल्यावर आपल्या पदरानें पुसलें व ती म्हणाली, 'काशिबाई! तुम्हीं महाराजांच्या सेवेस नरसिंहवाडीस असताना तुझ्या दोन्ही मुलांस संभाळण्याची हमी मी घेतें. घाटाच्या पायऱ्या उतरतांना तुम्ही काळजी करूं नका. महाराजांच्या मंडपांत त्यांना आणून सोडते...' कृष्णा

'येथील धार्मिक कार्याची माहिती तुम्ही सांगणार ना!'... आई

'ऐका. सांगते. या क्षेत्रात चौसष्ट योगिनी येतात. तसेंच अन्नपूर्णा, गणपती, मारुती, जान्हवी इत्यादी देवतावर्ग श्री गुरूंचे मुख्य सेवक आहेत. पहाटेपासून धार्मिक कार्यास सुरुवात होते. प्रथम

भूपाळ्या, नंतर पुजारी प्रेमाने महाराजांना आवाहन करतात. नं काकड आरती झाल्यानंतर ध्यानाष्टक, पुरुषसूक्त, न्यासपूर्व षोडोपचार पूजा, कृष्णाजलाचा अभिषेक होतो. पादुका पुसून झाल्यानं गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, आरती, मंत्रपुष्प अर्पण करण्यांत ये वर असलेल्या सनकादिकांची तसेंच उत्सवमूर्ती व सर्व स्वामींची पू होते. नंतर पुजारी मंदिरात येतांच तीर्थाची पूजा करून ते तीर्थ अंगारा भाविकांना देण्यांत येतो. हा कार्यक्रम सात वाजतां पूर्ण होत सकाळी ९ पासून भक्तांच्या विनंतीवरून अभिषेक पंचामृत, पूज लघुरुद्र इत्यादि कार्यक्रम १२-३० पर्यंत सुरू असतो. नंतर पादुकां पूजा सुरू होते. पादुकांना सुवासिक तेल व बुक्का लावतात. उष्णोदका पुसून झाल्यानंतर पंचामृत स्नान घालण्यांत येते. नंतर शुद्धोद स्नान, रुद्रावर्तन होते, नंतर पादुका छाटीनें पुसतात. नंतर फुलां पादुका सजवितात.

नंतर नैवेद्य अर्पण केला जातो. आरती, मंत्रपुष्प वगैरे विधी पू केले जातात.

संध्याकाळी ४ ते ६ कीर्तन, पुराण, वगैरे कार्यक्रम होतात. पुन्ह सायंकाळी पुजारी कृष्णा नदीचे स्नान करून पुजेचा कार्यक्रम पा पाडला जातो. नंतर पालखी फिरविण्यांत येते. हा कार्यक्रम सर्व भव ध्यानपूर्वक पाहतात व पालखी सोहळयांत भाग घेतात. यावेळी टें स्वामींची पद्यें आर्तभावानें म्हटली जातात. चातुर्मासांत पालखी बंद असते. तिच्या ऐवजी श्री गुरुचरित्रांतील इंदुकोटी स्तोत्र म्हणण्यात येते या क्षेत्रांत बाराही महिने यात्रा सुरू असते. शनिवारी श्रीगुरू नरसिंह सरस्वती यांचा जन्म झाला म्हणून हा दिवस येथे महत्त्वाचा आहे गेली ५०० वर्षें हे क्षेत्र भक्तीरसानें पावन झालें आहे. दत्तावतार संन्याशी स्वरूपाचा असल्यानें संन्याशांना पूज्य मानतात. त्या दृष्टीनें कांही संन्याशी सत्पुरुषांची समाधी मंदिरे येथे बांधली आहेत.' कृष्णा.

'महाराजांची सेवा कशी केली म्हणजे ती पावते?'

'सेवेमध्यें अंतःकरण हवें. तुमच्याकडे ते असल्याने तू जे करशील ती सेवा होईल. नामस्मरण कर. प्रदक्षिणा घाल. मंडपात बसून जें जे घडते ते पाहशील तरी त्या त्या ठिकाणी तुला महाराजांचे दर्शन घडेल.

कांही लोक महापूजा, पंचामृत पूजा एकादशिनी, लघुरुद्र,

महारुद्र, संततधार, विप्रसंतर्पण, सहस्रभोजन, धनवस्त्रसंतर्पण, माधुकरी घालणें, देवाचा कट्टा झाडणें तो दुपारी, रात्रौ धुणें, गुरुचरित्र वाचन, श्रवण, देवाची उपकरणें घासणें, पूजेकरतां पाणी भरणें, बागेंतील फुलें आणणें, माळा करणें, त्रिकाळ पूजा पाहणें वगैरे अनेक प्रकारें महाराजांची सेवा करतां येते.' असें म्हणता म्हणतां कृष्णाबाई कृष्णा नदीशी केव्हां एकरूप झाली हे काशिबाईंच्या ध्यानी सुद्धा आले नाहीं. आतां कृष्णा संथपणे वहात होती.

स्नान आटोपल्यावर आई इकडे तिकडे कृष्णाबाईस पाहूं लागल्या. पण आईच्या नजरेच्या कक्षेंत त्या दिसेनात. ओलेत्याने त्या घाटावरच बसून राहिल्या. औरवाडकडे (पूर्वेकडे) मधून मधून त्या पहात तर पंचगंगेच्या पलीकडे कुरवपूर (कुरुंदवाड) कडे त्या पहात. काय कोण जाणें, त्यांचे मन निराशेने ग्रासून गेलें. तशाच अवस्थेत घाटाच्या पायऱ्या चढून त्या वर गेल्या. तांब्यातून आणलेले पाणी महाराजांसमोरील पादुकांना बाहेरून अर्पण करून मुलांकडे आल्या.

'मला असली देवभक्ती जमणार नाहीं'... बाबा

'काय झालं?'..... आई.

'किती वेळ मुलांना संभाळू?' .... बाबा

'उद्यापासून असा वेळ लागणार नाही.'... आई.

'मी उद्यां येथून निघणार'.

'देव सर्वत्र आहे.... मुलांना शक्य असेल तर संभाळ. न पेक्षा तुजा देव संभाळेल'... बाबा

दुसऱ्या दिवशी बाबा निघाले.

'जाता कुठे'... आई

'दिशा नाही'..... बाबा

'निदान पत्र पाठवा.' .... आई

'जोंपर्यंत पत्र नाहीं तोपर्यंत खुशाल आहे असे समज म्हणजे झाले' ..... बाबा

बाबा निघाले खरे पण पैसा कुठे होता? चालत चालत जयसिंगपूरला पोहोचले. पूर्वीं दुकानावर असताना एक मित्र माल घ्यावयास यावयाचा. अकस्मात त्याची भेट झाली. आग्रहपूर्वक त्यानें बाबांना आपल्या घरीं नेलें. जयसिंगपूरपर्यंत येणें कसें घडलें ते ऐकून त्याला फार वाईट वाटलें. बाबा निघतां निघतां त्यानें वीस रुपये त्यांच्या

खिशांत कोंबले. नोकरी व्यवसायाबाबत त्यांना चौकशी करावयाची होती. त्या विचारांत असतांना खिशांतील पैशांचा त्यांना विसर पडला होता. त्यामुळें तसेच चालत चालत कोल्हापूरला आले. वाटेंत फक्त चहा घेतला. त्यासाठीं लागणारे सुटे पैसे त्यांच्या उजव्या बाजूला कोटाच्या खिशांत होते.

इकडे आई आम्हा दोघांना घेऊन महाराजांकडे त्यांच्या पादुकासमोर उभ्या राहिल्या. तिची श्रद्धा होती की दत्तमहाराजांना माझ्या मुलांची काळजी माझ्यापेक्षां अधिक आहे. मी काळजी करणारी कोण? दोन्ही मुलांना पादुकासमोर ठेवून त्या कृष्णा नदीचा घाट उतरून गेल्या. तांब्यातून कृष्णा नदीचे तीर्थ घेऊन त्यांनी पायरीवर आंघोळ केली. प्रदक्षिणा घालावयास सुरुवात केली. एक दोन तासांनी थकल्यावर आग्नेयेच्या बाजूस असलेल्या खांब्याकडे बसून माळेवर नामस्मरण सुरू केले. प्रवचन, हरिकीर्तन. भजन ऐकणें हा कार्यक्रम नित्याचाच सुरू होता. माधुकरीच्या वेळीं पांच घरीं जाणें व मिळेल त्या माधुकरीमध्ये दुपारी व रात्रौ प्रसाद भक्षण करून झोपी जाणें. या सर्व कार्यक्रमांत सारा वेळ निघून जावयाचा. महाराजांचे उपासक महाराजांना प्रसाद भेट द्यावयावे त्यांतील काही भाग तेथील अन्यउपासकांबरोबर मुलांना मिळावयाचा. तेथील पुजारी सुद्धा मुलांना केळी, पेढे, खारीक वगैरे द्यावयाचे. हां हां म्हणतां दोनतीन वर्षे केव्हांच निघून गेली. एक दिवस पहाटे तिला स्वप्न पडलें. 'चल नीघ.... तुझ्या सोबतीची व्यवस्था केली आहे.' रुद्राक्षांची माळ घातली आहे व एक पांढरे स्वच्छ वस्त्र परिधान केलेली व्यक्ती काशिबाईला बोलली व लगेच निघून गेली. त्या पायांतील खडावांचा आवाज ऐकता ऐकतांच काशिबाई जाग्या झाल्या. खडावाचा आवाज अजूनही त्यांना ऐकू येत होता.

''कोण, ही व्यक्ती? गेली तीन वर्षे कशी दिसली नाही! 'चल नीघ' म्हणून सांगण्याचा अधिकार या व्यक्तीला महाराजांनी दिला असेल काय? की महाराज स्वतःच बोलले! की केवळ हे स्वप्न होतें? पण स्वप्नांत तरी माझ्या मनांत असे विचार कां यावेत?'' असा विचार करतां करतां काशिबाई कृष्णाकाठी स्नानासाठी येऊन पोहोचल्या.

बऱ्याच दिवसांनंतर कृष्णाबाई काठावर येऊन काशिबाईची वाट पहात उभ्या होत्या. एवढ्यांत काशिबाईंस पाहून त्या म्हणाल्या, 'भाग्यवान अहांत तुम्ही काशिबाई!'...

'मी भाग्यवान कशी?' .... आई

'कारण दोनतीन वर्षें महाराजांची सेवा करण्याची संधि तुम्हास ळाली. इतरांना ऐवढी मुदत येथे राहण्याची संधि मिळत नाही.' कृष्णाबाई

'आज मला एक स्वप्न पडलें. त्याचा अर्थ काय?' .....आई.

'तुला आता जावयास परवानगी मिळाली आहे व तेंच ांगण्यासाठी महाराजांनी मला सांगितलें आहे. सोबतीची व्यवस्थाही हाराजांनी केलेली आहे. तुझे पती एव्हाना कोल्हापूर नरसोबावाडी ाडीत बसून इकडे यावयास निघाले आहेत.'..... कृष्णा.

'मग येथून गेल्यावर महाराजांची सेवा कशी करूं?'.... आई

तुळशीला प्रदक्षिणा घाल. नामस्मरण सुरू ठेव. तू जे भोजन ारशील त्यांतील काही भाग एका स्वतंत्र पानावर महाराजांना वाढ. ासेंच तूं जे खाशील ते खाण्यापूर्वी महाराजांचे स्मरण करून खा. ादा सर्वदा दत्तमहाराजांची आठवण ठेव......' कृष्णा.

'घरांत काही नसलें तर काय करूं?'.... आई

'महाराजांना त्यांची आठवण म्हणून तुलसीपत्राने पाणी सोड; परंतु तसें होणारच नाहीं. शक्य झाल्यास मुलांना बरोबर घेऊन रोज संध्याकाळी भजन म्हण. टेंबेस्वामींची करुणा त्रिपदी तुझी पाठ झाली असेल. ती सुरू ठेव....' कृष्णा

'महाराजांच्या भक्तांना ते जेथे जेथे असतील तेथे विविधरूपांनी प्रसंगविशेषी मदत करावयास मी तयार असते; त्यामुळेच आज एवढ्या दिवसांनी तुला भेटण्याची मला संधी मिळाली...... कृष्णा

हळूहळू कृष्णा नदीवर धुके दाटून आले. समोरचा मनुष्य सुद्धा दिसेना. धुक्याचे पांघरूण कृष्णा नदी व आसपासच्या भागावर दाटून आल्याने त्याच स्वरूपांत कृष्णामाई निघून गेल्या. मात्र तत्पूर्वी कृष्णाबाईंनी जलबिंदूचा शिडकावा आईवर केला. कृष्णाबाईंचा आशीर्वादच होता तो! पुनःश्च तीर्थस्नान काशिबाईंना झाले. देवालयासमोर त्या उभ्या राहित्या. आतां महाराजांचा वियोग घडणार म्हणून तिचे दोन्ही डोळे अश्रूंनी भरून आले. तिनें प्रदक्षिणा घालत असतांना त्या बोलत नसत. इतक्यांत बाबा मंडपांत येऊन पोहोचले. मला व दौलतला जवळ घेऊन त्यांनी पाठीवर हात फिरविला व आम्हाला घेऊन कट्ट्यावर ते बसून राहिले.

■ □ ■ □ ■

# गोमंतकात

आतां आम्ही मिरज-बेळगांवमार्गे गोव्यांत गाडीने जात होतो· बाबांनी एक शाळा स्थापन केली होती. दाभाळच्या शाळेंत १ ते ६ इयत्तांत बरीच मुले जमा झाली होती. वर्षाकाठी मुलांचे पालक धान्याच्य रूपानें किवा आर्थिक स्वरूपांत लागेल ती मदत करीत. शिक्षक म्हणून बाबांचा जम छान बसला होता. त्या शाळेंत हातांत पैसा या ना त्या निमित्तानें येत होता. गेल्या दोन वर्षांत त्यांनी शाळेला चांगला दर्जा मिळवून दिला होता. आपल्या गावांत मास्तर रहावयास हवेत म्हणून ग्रामस्थ वाटेल ती सोय करावयास तयार असावयाचे. त्यांनीच मास्तरांना रहावयास खोली दिली होती. आम्ही दाभाळला पोहोचल्यानंतर आणखीन एक बाजूची खोली ग्रामस्थांनी दिली. आवश्यक तेवढी भांडी होती. आम्हा दोघा भावांना दोनदोन हाफ शर्ट व दोनदोन हाफ पॅन्टस् बाबांनी शिवून घेतल्या. मास्तरांच्या मुलांकरितां कपडे शिवून देण्याच्य. बाबतीत नाममात्र शिलाई घेतली जात असे. गावांत शंकरमास्तरांचा दबदबा मोठा होता. दिवस गुलाबी वाटत होते. गांवातील लोक बाबांना शंकरमास्तर म्हणत.

शाळेची भरभराट पाहून बाबांच्या एका मित्राला चालती शाळा आपण घ्यावी असे वाटू लागले. गावांतील काही गावकऱ्यांना हाताशी धरून त्याने या शाळेत उपशिक्षक म्हणून नोकरी मिळविली. एकदोन वर्षांनी काही मतभेद झाल्यानंतर शंकरमास्तरांना शाळा सोडणे भाग पडलें. माझ्या वडिलांसमोर 'पुढे काय?' हे प्रश्नचिन्ह उभे राहिलें.

आईला ही बातमी नव्हती. रात्रौ अर्धवट झोपेत 'साखळी' 'साखळी' असा ध्वनी तिच्या कानी आला. सकाळी उठताना सुद्धा हाच ध्वनी तिला ऐकू आला. शेजारच्या माणसांना या शब्दाबद्दल विचारतां तेथें एक दत्तमंदिर असून गोव्यातील तें एक जागृत देवस्थान असल्याचें समजले. आईने बाबांकडे पाहिलें. ते सचिंत मुद्रेने बसले होते. चौकशी करतां नोकरी सोडल्याचे त्यांनी सांगितले.

'उद्या आपण साखळीला जाऊन येऊ....' आई.

'साखळीला कोण आहे आपला?....' बाबा.

'तेथें दत्तमहाराज आहेत'..... आई.

'ठीक, तुला तेथे नेईन.' बाबा.

दुसऱ्या दिवशी आम्हीं सर्वजण साखळीला आलों. दत्तमंदिरात दुपारची आरती सुरू होती. धूप , कापूर, अगरबत्ती वगैरेच्या वासानें गाभारा सुगंधाने भरून निघाला होता. आई तर फार आनंदात होती. आम्हां तिघांना तेथे ठेवून बाबा सामान आणण्यासाठी दाभाळला गेले. दोन दिवसांनी त्यांनी सामान आणले. ग्रामस्थांनी त्यांना समारंभपूर्वक निरोप दिला. बरीच मुले गांवच्या वेशीपर्यंत आली होती. त्यांनी अश्रुपूर्ण नयनांनी बाबांना नमस्कार केला. गांवचे बरेच लोक हळहळले.

सामान आल्यावर दुसऱ्या दिवशी बाबा म्हणाले, 'येथें राहून आपले पोट भरणार नाही.'

'मग काय करावयाचे ठरविले आहे....' आई.

'येथून मी निघतों व दिशा मिळेल तेथें जातों.' ......बाबा

'माझें सोडा; पण दोन मुलांचे काय करू?'.

'तुझा दत्तमहाराजांवर विश्वास आहे ना! महाराज काय सांगतील ते ऐक. माझी काळजी करूं नकोस. सर्व जबाबदारी महाराजांवर टाक म्हणजे झाले.....' बाबा

बाबा निघाले. पुनःश्च आम्ही तीन माणसें दत्तगुरूंच्या छायेखाली राहू लागलों. आईकडे प्रसंगासाठी राखून ठेवलेले पन्नास रुपये होते. दत्तमहाराजांचे पैसे म्हणून सहसा ती खर्च करत नसे.

नरसोबावाडी सोडल्यानंतर बाबांनी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करून पत्रिका, टीपण कसें तयार करावें वगैरे ज्ञान संपादन केलें होते. हस्तरेषा, प्रश्नकुंडली या दोन्हीचा विचार करून ते उत्तरें देत असत. या ज्ञानाच्या जोरावर आपण कोठेही शहरांत पैसा मिळवूं असा त्यांना विश्वास होता. तसेंच पेढीवर कारकुनीचें काम म्हणजे त्यांच्या हातचा मळ होता. परिस्थितीमुळें सर्वसामान्य शिक्षण घेतलेला मनुष्य कसा तयार होतो यांचे चालते बोलतें उदाहरण म्हणजे आमचे बाबा.

बाबा निघाले व पुढे ४-१ महिने कोठे होते हें त्यांनी मुळीच कळविले नाही. इकडे साखळीस असताना आईने पूर्वी जमा केलेले थोडेथोडे पैसे ऐन प्रसंगी आम्हाला उपयोगी पडले. आईचा

नित्यक्रम म्हणजे प्रातःकाली स्नान, देवपूजा व आम्हां लहान मुलांना उकड्या तांदळाची पेज व तोंडी लावण्यास खारांतील आंबाडी..........बस्स! सकाळचें आमचे एवढेंच जेवण, दुपारी आरती झाल्याशिवाय आई कांहीच खात नसे. तोपर्यंत साखळीच्या मंदिरात प्रदक्षिणा घालण्यांत व माळेवर जप करण्यात तिचा सर्व वेळ जात असे. दत्तगुरु हा तिचा जप अव्याहत सुरू असे. आम्हाला कोणताच आजार झाला तर तिचें औषध तयार असे. पेल्यात थोडे पाणी घालून त्यांत महाराजांचा थोडा अंगारा घालत असे. झालें. तिचें औषध तयार झाले! हें औषध घेऊन आम्हांस बरें वाटत असे. ती म्हणे, 'हे दत्तमहाराजांनीं दिलेले औषध आहे. आमची शंभर टक्के श्रद्धा आईवर असल्याने आमचा देव म्हणजे आईच बनलेली होती.

एक दिवस मी असाच आजारी झालो. आईनें औषध दिलें, पण गुण येईना. 'श्री गुरुदेवदत्त' असा आवाज कानी आला. 'काशीबाई!' म्हणून हाक ऐकू आली. आई माझ्या कपाळावर मिठाच्या पाण्याची घडी वारंवार घालून काढत होती. मी तर तापाने फणफणत होतो. एवढ्यात हाक कानी येताच आईला मोठा धीर आला. हा आवाज तिच्या परिचयाचा होता. दरवाजाच्या दिशेने आई गेली. 'कोणऽऽ कृष्णाबाई, घरांत या' असे म्हणून आई माझ्याकडे आली व कृष्णाबाईना बसावयास पाट दिला

'शेजारी वैद्य आहेत. त्यांना घेऊन या. ते औषध देतील. महाराजांनी तें दिलेलें औषध माना. मुलाला गुण येईल. मी तोपर्यंत बसून रहतें' ...... कृष्णाबाई म्हणाल्या.

'त्यांनी माझ्याकडे जास्त पैसे मागितले तर कोठून देऊ?..........

'ते मागणार नाहींत.'..........

'तर मग जातें............

समोर वैद्य बसले होते. कपाळावर गंध. डोळ्यांवर चष्मा. शेकडो भस्माच्या बाटल्या टेबलावर होत्या. 'दत्तगुरू' हा त्यांचा नामजप कामात असतांना सुद्धा सुरू होता. समोरच्या बाकड्यावर आजारी लोक औषधासाठी बसले होते. प्रत्येकाला पाळी येईल तसे औषध व पुड्या दिल्या जात होत्या. काशीबाई एका कोपऱ्यात उभी होती. तिच्या चेहऱ्यावर चिंता दिसत होती.

वैद्यराजांनी तिला नांव विचारतांच 'काशीबाई' असे सांगितलें.

'काय काम? ..................वैद्य

'मुलगा फार आजारी आहे.'

उपस्थित असलेल्या सर्व रोग्यांना त्यांची समज घालून वैद्य निघाले. दत्तमहाराजांना सबंध दिवस प्रदक्षिणा घालणाऱ्या काशिबाईंना सर्वजण ओळखत होते. ती मात्र फक्त दत्तमहाराजांनाच ओळखत होती. वैद्य घरी आले. त्यांनी मला तपासलें व मधातील भस्माचे चाटण दिवसांतून तीन वेळा देण्यास सांगितले. 'मुलाला बरें वाटेल काशिबाई, महाराजांची तुमच्यावर खास कृपा आहे. काळजी करूं नका. कोणत्याही वेळी मला निरोप पाठवा मी तत्क्षणी येईन' वैद्य म्हणाले. पैसे विचारतांच 'पैसे नकोत' असे सांगून ते निघून गेले.

'काशिबाई, मी आतां येते'...........कृष्णाबाई

'थांबा. कुंकू लावते.'

काशिबाईनी करंडा उघडला व कृष्णाबाईना कुंकू लावलें. कृष्णाबाईंनी सुद्धा कुंकू लावले व म्हणाल्या.......... 'काशिबाई, देव सर्वत्र आहे. दत्तमहाराजही सर्वत्र आहेत. ज्या अडचणी संबंधित माणसे दूर करतील किंवा तसे करण्याचा अधिकार व ज्ञान ज्यांना आहे त्यांना महाराजांचे स्मरण करून अडचणी सांगाव्यात; म्हणजे यश मिळते. अंधश्रद्धा नको. व्यवहारी ज्ञानाचा उपयोग अखंड नामस्मरण सुरू ठेवून करावा. तसा तूं न केल्याने आज माझें इकडे येणे झाले. तुझी श्रद्धा हिमालयासारखी निश्चल असल्यामुळे महाराजांनी मला इकडे पाठविले. आतां मी जाते.' असे म्हणून कृष्णाबाई प्रकाशरूपाने जाऊं लागल्या. काशिबाई तिकडे एकटक पाहू लागल्या. एक प्रकाशपुंज सह्याद्रीच्या दिशेने केव्हां दिसेनासा झाला हें काशिबाईस सुद्धा कळले नाहीं. माझा ताप उतरूं लागला. मी चांगला हिंडूफिरूं लागलो.

नामस्मरणाला श्रमांची जोड दिली पाहिजे. काम करता करता नामस्मरण ही दिक्षा तिला आज मिळाली. देवाने बुद्धी दिली आहे. तिचा योग्य उपयोग आपण केला पाहिजे. आपला भार देवावर सुद्धा उठल्या सुटल्या टाकून उपयोग नाहीं.

नामस्मरणाला कामाची जोड दिली पाहिजे म्हणून परसांतील बागेत तिने निरनिराळ्या प्रकारची पालेभाजी लावावयास सुरुवात केली. त्यासाठी विहिरीचे पाणी आणून तिला घालावे लागत असे. फुलझाडे व औषधी वनस्पती लावावयास सुरुवात केली. गांवातील लोक भाजी न्यावयास तेथे येऊ लागले. वैद्यांना औषधी वनस्पती मोफत देणे तिला योग्य वाटले असले तरी दादावैद्य पैसे देत असत. भाजीपाला

व फुलें यांचा पैसा ती घेऊ लागली. या व्यवसायाला शिवणकामाची तिने जोड दिली. शेजारच्या महिलांच्या चोळ्या, लहान मुलांमुलींचे कपडे शिवून द्यावयास तिने सुरुवात केली. असे दिवस जाऊं लागले. बाबांची १० रुपयांची मनिऑर्डर सहा महिन्यांनंतर आली. दोन दिवसांनी पत्र आले. त्यांना म्हापसे येथून दोन मैलांच्या अंतरावर काजू कारखान्यात नोकरी मिळाली होती. आईला व आम्हाला न्यावयास ते येणार होते.

स्वावलंबन व नामस्मरण या दृष्टीने आई यशस्वी झाली होती. बाबांचा शब्द तिला मोडतां येणे शक्य नव्हते. परसात लावलेला भाजीपाला व इतर वनस्पती सुकून जाणार. त्यांना जीव असतो. उन्हांत पाण्यावाचून वनस्पतीला तडफडत ठेवावयाचे व आपण जावयाचे ही घटना तिला अस्वस्थ करून टाकणारी होती. निर्णय कोणता घ्यावयाचा हे तिला कळत नव्हते. तेवढ्यात बाबांचे दुसरे पत्र 'जागेच्या शोधात असल्यानें पुढील महिन्यात येण्याचे करीन' असे आले. या महिन्यांतील जाणे दुसऱ्या महिन्यावर गेल्याचा आनंद काशिबाईच्या चेहऱ्यावर दिसत होता. मात्र आज ना उद्या ही जागा सोडणार याची बातमी कर्णोपकर्णी जागेच्या शोधांत असणाऱ्या भाडेकरूंना लागल्यानें जागेच्या मालकाकडे त्यांच्या खेपा होऊं लागल्या.

जागेसाठी आलेल्या प्रत्येक भाडेकरूला मालकाचे एकच सांगणें होते की 'काशिबाई गेल्यानंतर पुढचे काय ते ठरवू.'

'मी अधिक भाडे देईन.' एकजण म्हणाला. 'मी जागा नीटनेटकी ठेवीन.' दुसरा म्हणाला. 'जरूर ती दुरुस्ती माझ्या पैशाने करीन.' तिसरा म्हणाला. 'आपण सांगाल त्यावेळी जागा खाली करून देईन.' चौथ्याने सांगितले. शांतपणें सर्व इच्छुक भाडेकरूंचें म्हणणे ऐकून घरमालक एवढेच म्हणाले, 'काशिबाईनी स्वेच्छेने घर सोडल्यानंतर जागा कोणास द्यावयाची तें ठरवीन.' असें सांगून त्यानें सर्वांना निरोप दिला. हां हां म्हणतां महिना केव्हांच संपला. बाबा घरीं येऊन पोहोचले. 'आपण उद्यां निघावयाचें' असें त्यांनी सांगितलें.

'आज आपण दोघांनी घरमालकांना भेटून घर सोडण्याच्या बाबतींत सांगणें बरें वाटतें. ......आई.

'सायंकाळी त्यांना भेटावयास जाऊं.' असें बाबा म्हणाले.

ठरल्याप्रमाणें मालकाच्या घरीं बाबा व आई येऊन पोहोचले. बाहेर एका खुर्चीवर बाबा बसले. आई मात्र उभी होती. आंतून मालक आले.

'नमस्कार!'..... बाबा

'विशेष काय काम? .....मालक

'उद्या निघावयाचें असें ठरविलें आहे.' .....बाबा म्हणाले.

'जशी आपली इच्छा!' ...मालक म्हणाले.

'माझी एक विनंती आहे'.... आई.

'कोणती?' .....मालक

'परसांतील फुलझाडें व इतर रोपें उन्हांत करपून जातील....' आई.

'काशिबाई, ती काळजी आपण करूं नका. त्याबाबत सर्व काळजी घेणारे भाडेकरू पाहीन व त्यांनाच जागा देईन. मग तर झालें ना!

भाडेकरू मिळेपर्यंत आमच्या घरांतील कामकरीण व गडी यांच्या मार्फत ती व्यवस्था पाहीन. आपण उभयतांनी चहा घेऊन जावयाचें. यापुढें केव्हाही तुम्हांस जागा हवी असल्यास त्याबाबत व्यवस्था केली जाईल.' श्री दत्तगुरु तुम्हांस केव्हांही अंतर देणार नाहीं, असे मालकांनी सांगितलें व ते आपल्या कामास निघून गेले. प्रामाणिकपणा, स्वावलंबन, भक्तीभावपूर्ण, आचारविचार या सद्‌गुणांनी काशिबाई सर्व गावांत ओळखली जाई. तिला मानसन्मानाची वागणूक मिळे.

दुसरा दिवस उजाडला. हिवाळा संपून आतां उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले होते. आईला सर्व ऋतु सारखेच वाटत. नामस्मरणांतून तिला एवढा उत्साह वाटावयाचा कीं आर्थिक उन्हाळा सुद्धा तिच्या लक्षांत येत नसे. आपल्या सोबत सर्वत्र दत्तमहाराज आहेत असें तिला सातत्यानें वाटे. 'हरिचीया दासा हरी सर्व दिशा' अशीच तिची स्थिती झालेली होती. आतां आम्ही म्हापशाच्या दिशेनें जात होतों. तेथून आकईला गेलों. बाबांनी एक घर पाहिलें होतें. एका ख्रिश्चनाचें तें घर होतें. बाहेर अंगणांत पांढऱ्या रंगाचा क्रॉस होता. आंत एका बाजूला वृद्ध बाई (घराची ख्रिश्चन मालक) रहात होती. तिला कोणाची तरी सोबत पाहिजे होती.

मालकिणीला पैसा नको होता. भाडें नको होतें. फक्त सोबत हवी होती. बाबांना मोठी शंका होती. ख्रिश्चनाच्या घरांत आपली पत्नी कशी राहणार? अनुभव मात्र वेगळा आला. आईनें जागा पसंत केली. दत्तमहाराजांनी दिलेली जागा वाईट कशी असेल? आम्हीं सर्वांनी तेथे मुक्काम केला.

तेथील दिवस फार चांगले गेले. झाट्ये नावाच्या एका धनपतीचा काजू कारखाना असावा. त्या कारखान्यांत बाबा कारकून म्हणून काम

करीत होते. मळगांवचे पाटकर नांवाचे एक शिक्षक (पुढें बेळगांव ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्राध्यापक म्हणून ते काम करत होते.) खाजगी शिकवणीसाठीं ठेवण्यांत आले होते. त्यांनी आम्हाला लेखन वाचन शिकवलेंच. इतरही अभ्यासक्रम घेतला. शिवाय त्यांनी आम्हांला कांही भजनें शिकविलीं. 'जाहलें भजन आतां नमितों तव चरणां' सारखीं भावपूर्ण भजनें ऐकतांना फार फार आनंद वाटे. जवळ जवळ एक वर्षानंतर पुन्हां बाबांची नोकरी गेली. पुढें काय? हें प्रश्नचिन्ह आईबाबांसमोर येत होते. त्याच दिवशी कृष्णाबाई दत्त म्हणून हजर. मी धड जागाही नव्हतो व झोपेंतही नव्हतों. कृष्णाबाई आईच्या कानांत कांही बोलल्या व आल्या आल्या निघून गेल्या. त्या दिवशी आई प्रसन्न दिसली.

संध्याकाळी वडील आले व उदासीनपणें बाकावर बसले. आईने चहा आणून दिला. 'उद्या आपण तांबोसें येथे. (माहेरच्या गांवी) जावयाचें. तेथील शेतीवाडी पाहीन. तेथें कोणीच नाही. आईने बाबांना सुचविलें. बाबांनी लगेच होकार दिला. आम्हीं सर्वजण तांबोसे येथे आलो. आईच्या वडिलांकडून खोटें गहाणखत पेडणें येथील एका जमीनदारानें घेऊन ती जमीन आपली म्हणून त्यानें गांवातील एका ग्रामस्थास कूळ म्हणून दिली होती. अर्थात दरवर्षाला दोनशें रुपये देण्याचें करून आईने जमीन सोडवून आणली व आपल्यामार्फत कुळास कसविण्यास दिली. बागायती स्वतःच्या देखरेखीखाली पाहूं लागली. नारळीची झाडें, कोकम, आंबा, फणस, काजू वगैरे उत्पन्न होते. हें सर्व ताब्यांत घेईपर्यंत फार त्रास झाला. जमीन बारमाही उत्पन्न देणारी होती. खंडाचें भात मिळे. तूर डाळ, ऊस वगैरे उत्पन्न त्या काळांत कुळें काढत असत. अर्थांत आर्थिक बाजूमध्ये सुधारणा झाली.

त्या वर्षांत आईनें दौलतकडून (माझा थोरला भाऊ) काशीखंड, कथाकल्पतरू, जैमिनीअश्वमेध, रामायण, महाभारत वगैरे ग्रंथ वाचून घेतले. देवखोलींत मीही बसत असे. मला त्या वाचनांतील गोष्टी आवडत होत्या. विठ्ठल मंदिरांत कुणाचें कीर्तन-प्रवचन असलें तर आई आम्हाला घेऊन जात असे. कीर्तनाची मला फार आवड असे. प्रवचनांत एक मनुष्य आपल्या पांडित्याच्या जोरावर सभेला प्रवचन सांगत असतो. कीर्तनांत त्याचे इतर साथीदार असतात. व सर्वांच्या प्रतिसादाची तो दखल घेत असतो. छोटी छोटी उपकथानके विनोद, संगीत गाणीं यामुळें मला फारफार आनंद होई.

एक दिवस तेंडोलकर नांवाचे एक यती 'श्री गुरुदेव दत्त' म्हणून आमच्या घरीं अचानक आले. हे तेंडोलकर माझ्या आजोळच्या आजोबांचे (आईच्या वडिलांचे) मित्र. त्यांनी गोमंतकातील व दक्षिणोत्तर भारतांतील अनेक तीर्थक्षेत्रे पाहिली होती. ते सरस्वती मार्गांतील (दत्तसंप्रदाय) होते. ते एक वेळ भोजन करीत. एका गांवात एकच दिवस रहात. ज्या दिवशी ते आले तो दिवस 'गुरुवार' होता. आईनें आग्रह करतांच ते थांबले व विहिरीवर स्नान करून आले. त्या दिवशीं देवखोलींतील देवपूजा त्यांच्याकडून व्हावयाची होती. आईने नित्याप्रमाणें पानें ठेविली. दत्तगुरूचे पान देवखोलींत होतें. तेंडोलकरांनी दत्तमहाराजांना नैवेद्य दाखविला. इतर पाने कुणासाठी म्हणून विचारतांच 'घराकडील देव, माहेरचे देव, रामपंचायतन, बांदेश्वर' अशीं नांवे सांगतांच त्यांनाही नैवेद्य दाखवून दत्तमहाराजांचें पान स्वत: भोजनासाठीं घेतलें. भोजन होतांच त्यांनी आवराआवर करून जाण्याची तयारी केली. जातांजातां ते म्हणाले, 'शिवरामाची तूं थोरली मुलगी ना! तुझे माहेरचें नाव शांताबाई ना? घरचें नांव काशिबाई! तुझी मनोकामना पूर्ण होईल. मुलांना शिक्षण मिळेल. अडचणी आल्या तरी नाममंत्र सोडूं नको.' असें म्हणून ते निघून गेले.

आता संध्याकाळचे दोनअडीच वाजले होते. नित्याप्रमाणे मी बाहेरच्या पडवींत झोंपलों होतों. आई देवखोलींत बसलेली होती. लामणदिवा पेटत होता. देवखोलीतील वातावरण फुलें, अगरबत्ती, धूप वगैरेमुळें सुगंधरूप झालें होतें. माळेवर जप सुरू असतानाच आईला झोप आल्यामुळें ती भिंतीला लागून कलंडली. माझे डोळेही पेंगत होते. मला पण झोप आली.

मी सायंकाळी उठलों तर आई तशीच भिंतीला टेकून झोपलेली होती. तिच्या जवळ गेलों तर झोपेंतच ती हासत होती. तिचा चेहरा प्रसन्न दिसत होता. मधून मधून 'दिगंबरा, दिगंबरा' म्हणत होती. हळू हळू, ती जागी झाली, तर मी तेथे उभा! 'मी कोठे आहे?' तिनें विचारलें.

आई, तूं देवखोलीतच मघापासून झोपली आहेस.'

'असें कसें होईल?' तिने विचारलें.

'मग तू कोठे होतीस ?' मी विचारले.

'तीर्थयात्रेच्या प्रवासांत!' ती म्हणाली.

'सोबत कोण होते!' .... मी विचारलें

'दत्तमहाराजांची सेविका!' .....ती

'तिचे नांव..... मी सांगतां नये अशी तिची मला आज्ञा आहे.'

आपण हलकी हलकी होऊन कशी तरंगू लागलें व नंतर प्रवासास कसा वेग आला याचे वर्णन तिनें केले. कोणकोणत्या स्थळांचें दर्शन घेतलें त्या संबंधीही तिने मला पुष्कळ माहिती सांगितली.

आईचा प्रवास सुरू झाला होता. 'काशिबाई, प्रथम नरसोबावाडीस जाऊं. हे पहा शिरोळ. शिरोळनजिक ही पहा नरसोबावाडी. या क्षेत्राच्या आग्नेय दिशेस थोड्याच अंतरावरील कृष्णा पंचगंगा संगम. या ठिकाणी अमरेश्वर देव असून त्याच्या जवळ ६४ योगिनी आहेत. तेथें शक्तीतीर्थ आहे. सर्व रोगांचे निवारण या ठिकाणीं होतें. श्रीगुरूच्या मुख्य स्थानाचे उत्तर बाजूस कृष्णेच्या पश्चिम वाहिनीचे प्रवाहास शुक्लतीर्थ म्हणतात. त्याचे खालील बाजूस पापविनाशीतीर्थ, काम्यतीर्थ, सिद्धवरदतीर्थ, प्रयागतीर्थ, शक्तीतीर्थ, अमरतीर्थ व कोटीतीर्थ अशी अष्टतीर्थें मुख्य असून या ठिकाणी स्नान केले असतां पुण्यप्राप्ती होते. दक्षिण भारतांतील ही दुसरी काशी होय. या क्षेत्री अन्नदान घडावें म्हणून कांही पुण्य-पुरुष अन्नसत्रे घालत आहेत.

श्री गुरुदत्तात्रेयावतार श्री सद्‌गुरु नरसींह सरस्वती स्वामी महाराज यांच्या आगमनानें हे स्थान पुनीत झालें आहे. श्री गुरूनी येथे १२ वर्षे योगाभ्यास करून नंतर गाणगापुरास गेले.

प्रवासाची गती वाढत होती. 'आता आपण गाणगापुरास आलो' महाराजांची सेविका म्हणाली. भीमा अमरजा यांच्या संगमापासून एक मैलावर हे जे क्षेत्र दिसते तेच दत्त महाराजांचे महान क्षेत्र आहे. याचा उल्लेख श्री गुरुचरित्रात गाणगापूर, गंधर्वभुवन, गंधर्वपूर असाही आहे. वटकुल, नरसिंह, भागीरथी, पापविनाशी, कोटी रुद्रपाद, चक्र, मन्मथ अशी ही आठ तीर्थे आहेत. ती पाहून घे. आता आपण दक्षिण भारतात जाऊ या. हें पहा रायचूर. येथून २१ मैलांवरील 'कुरगुड्डी' हे बेट पाहा. येथे एकमुखी दत्तात्रेयमूर्ती टेंबेस्वामीनी स्थापन केली आहे. हे पहा गोमंतकीय प्रदेश. हा साखळी गांव. हे पाहा दत्तमंदिर. महाराजांची दिवसांतून एक खेप येथे असते. आपल्या सेवकांची काळजी घेण्यासाठी.

आतां आपण पुन्हा महाराष्ट्रांत जाऊं. औदुंबर, माहुर, पांचाळेश्वर, पिठापूर प्रमुख क्षेत्रे पहा. ब्रह्म पुराणानुसार शंकर हा दत्तात्रेयाचा गुरु होय. दत्तात्रेयांचा आश्रम सिंहाचलावर प्रयागवनांत आहे. माहुर, पांचाळेश्वर आणि कोल्हापूर हीं त्यांची विहारस्थानें आहेत. पांचाळेश्वरीं

स्नान, कोल्हापुरांत भिक्षाटन व माहुरगडाच्या शिखरावर शयन असा त्यांचा क्रम आहे.

आतां आपण उत्तरेकडे जाऊं. हा अचलगड पाहा. जवळच असलेलें ओरिया नांवाचें गांव पहा. अबु पर्वतावर उंच शिखर दिसत आहे. त्या शिखराकडे जाणारा हा रस्ता पाहा. येथे वर दिसतें ते श्री दत्तात्रेयांचे निवासस्थान. ही पाहा त्यांची पदचिन्हें एका शिळेवर तीं असून हे त्यांचे छोटें देऊळ पहा.

आता गिरनारला जाऊं. हा पर्वत आहे. श्री गुरु दत्तात्रेयांचे निवासस्थान अती उंचावर आहे. येथून जवळच श्री. टेंबेस्वामी यांची समाधी आहे.

हे पहा जुनागड संस्थान. सातकुंडातील सात शिळा पहा. या सातही शिळांमधून एकत्रित झालेले पाणी! येथे श्रीगुरु दत्तात्रेय यांचे मंदिर आहे.

आता मध्यभारतांत जाऊं. हा वर्धा जिल्हा. कुण्डलपूर हे भीष्मक राजाच्या राजधानी कुण्डलपूर हे या राजधानीचे नांव. श्रीगुरु दत्तात्रेय अनसूया यांचे मंदिर पहा.

काशिबाई, ही महत्त्वाची दत्तक्षेत्रे तुला दाखविली. इतर क्षेत्रे तुला मागाहून दाखवीन. ती पाहण्यासाठी तुला कुठेही प्रवासास जाण्याचे कारण नाहीं. तुझ्या मनाच्या स्वच्छ आरशांत सर्व देवदेवतांचे व क्षेत्रांचे दर्शन घडेल. श्री. तेंडोलकरयतीना दिलेले गुरुप्रसादाचें भोजन दत्तगुरूंना मिळालें व महाराजांनी तुझ्याबरोबर जाण्याची मला आज्ञा केली. तू आप्तकाम आहेस. निरपेक्ष सेवा हें तुझें व्रत असल्याने तू भाग्यवान आहेस!' हे सर्व ऐकतानाच आई देवखोलींत जागी झाली होती. तिला आपण कोठे आहे याचा संभ्रम पडला होता. सत्य काय? ते सत्य होते की स्वप्न होतें की आता मी देवखोलीत आहे हे तरी सत्य कशावरून? माझे अस्तित्व तरी सत्य कशावरून?.... अशा संभ्रमावस्थेत तिने मला 'मी कुठे आहे?' असा प्रश्न विचारला होता.

■ □ ■ □ ■

# माझा भाऊ दौलत

दौलत माझा भाऊ. दौलतपूर्वीच्या माझ्या दोन बहिणी लहानपणींच देवाघरी गेल्या. तिसरा दौलत. आंजगांवच्या आजोबांनी त्याचे नांव गुंडू ठेवलें. त्या काळांत अशीं नावे ठेवण्याचा प्रघात होता. 'माझो गुंडो धोंडो – 'खंयसरही वाढो' असें म्हणून हे नांव आजोबांनी ठेवलें. नांव ठेवताना कोणीतरी 'दौलत' असें नाव सुचविले. सर्वांच्या नजरा हे नांव सुचविणाऱ्या माझ्या आजोळच्या आजोबांकडे गेल्या. शेवटी गुंडू हेंच नांव मुक्रर करून बाबांनी शाळेच्या कागदोपत्री नमूद केलें.

लहानपणापासून त्याचा आजारानें पिच्छा पुरविला, प्रकृतीने तो फार दुबळा होता. प्रवृत्तीने मात्र दयाळू होता. खोट्याची त्याला चीड येई. त्याच्या स्वभावाचा स्थायीभाव हा धार्मिक होता. दुसऱ्याचें शांतपणे ऐकून घेणें व थंडपणे उत्तर देणें हे त्याचे वैशिष्ट्य होतें.

तो साधा, सरळ, पापभिरू, सात्त्विक वृत्तीचा होता. अभ्यासांत तो उजवाच होता. तो दृश्य सृष्टीला ईश्वरांचे प्रेममय स्वरूप मानत असे, तर परमेश्वराकडे पाहताना प्राणिमात्राच्या हृदयांत त्याचें दर्शन घेई.

त्याच्या लहानपणांत आईने जीं जीं धार्मिक पुस्तके वाचावयास दिली, त्याचा परिणाम त्याच्या बालमनावर झालेला होता. रामायण महाभारतांतील गोष्टी तो वाचत असे व आईनें विचारलेल्या प्रश्नांची उत्तरें देत असे. या वाचनाच्या आवडीमुळे पुढे त्यानें ह. ना. आपटे, नाथमाधव वगैरे लेखकांची पुस्तके वाचून काढली. पुढे पुढे तो 'कवि गुंफराज' या नावाने कविता लिहावयास लागला. वृत्तपत्रांत प्रासंगिक लेख लिहू लागला. काही ऐतिहासिक स्वरूपाची संशोधनपूर्ण पुस्तकें लिहिली. तर काही पुस्तकांचे संपादन केलें. अनेक संतचरित्रें जी गेली शंभर वर्षे हस्तलिखित स्वरूपांत होती, त्यांचे प्रकाशन केलें.

लहानवयांतील आध्यात्मिक बीज उत्तर आयुष्यांत रुजून त्यांचा भला वृक्ष झाला व स्वामी चिदानंद, श्रीमत परमहंस पद्मनाभतीर्थ स्वामी, श्री आनंदनाथांचे अप्रकाशित अभंग, श्री. जोशी महाराज, पुणे यांचे चरित्र व इतर वाङ्मय यांची रसाळ फळे त्या वृक्षाला लागली.

आचार्य अत्रे, डॉ. भीमराव आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, श्री वा. रा. ढवळे, मुंबई विद्यापीठाचे मराठी विभागाचे प्रमुख श्री. व. दि. कुळकर्णी श्री. रा. भि. जोशी श्री. मा. कृ. शिंदे, श्री. वि. स. खांडेकर, डॉ. पंढरिनाथ प्रभु, श्री. गं. दे. खानोलकर, श्री. न. र. फाटक आझाद हिंद सेनानी श्री. भोसले इत्यादी व्यक्तीशी त्याचा विशेष परिचय होता. प्रभु गुंफराज या नांवाने त्यानें काव्यलेखन केलें आहे.

समाजातील दीनदुबळ्या लोकांबद्दल त्याची दयाबुद्धी जागृत होई. आपल्या उत्तरवयांत आर्थिक दृष्ट्या अनेकांना मदत केली. कुटुंबातील सर्वांना त्याने समत्व बुद्धीने वागविले. तो केवळ बुद्धिनिष्ठ नव्हता. त्याच्या विचारांना विवेकाची जोड होती. कुणाच्याही बाबतीत तो दीर्घद्वेषी केव्हाही नव्हता.

अध्यात्म पुरेपूर त्याच्या आचरणांत होतें. आईने बालवयात त्याच्याकडून जे वाचन करून घेतले होते त्यामुळे त्याच्या वर्तनात सात्त्विकता दृग्गोचर होऊ लागली. भक्तिप्रधान व पौराणिक ग्रंथांच्या भावपूर्ण वाचनाने आईच्याही आध्यात्मिक व्यक्तिमत्वाला अर्थपूर्ण आकार मिळू लागला. रामायणातून आदर्शवाद व महाभारतातून समाजदर्शन आईला होऊ लागले ते त्याच्या वाचनांतून व स्पष्टीकरणातून हे विसरून चालणार नाही.

■ □ ■ □ ■

# प्रश्नोत्तरें

## काही प्रश्नोत्तरें (आईकडून मिळालेली.)

*[आईच्या आध्यात्मिक दृष्टिकोनाच्या संदर्भात केंव्हा केव्हा मी लहानपणापासून तिला प्रश्न विचारत असे. माझ्या आठवणीप्रमाणे मी ती प्रश्नोत्तरे उद्धृत करतो.]*

**प्रश्न : देवदेवतांना नैवेद्याची पानें तूं नेहमी ठेवतेस. ते देव किंवा देवता नैवेद्य जेवतात काय? तसें कधीच घडत असल्याचे दिसत नाही.**

उत्तर : याचें उत्तर म्हणजे हें क्षेत्र श्रद्धेवर अवलंबून आहे. देवदेवता त्यावेळी हजर असतात व त्या समोर ठेवलेला नैवेद्य हस्तस्पर्श करून स्वीकारल्याचे दर्शवितात. मला तर स्पष्टपणें छायारूपाने अगर प्रकाशरूपाने त्यांची उपस्थिती भासते. मला फार आनंद होतो. माझी इच्छाशक्ती वाढते. कोणत्याही प्रसंगास मी धैर्याने तोंड देऊ शकतें.

**प्रश्न : देवदेवता मला कां दिसत नाहीत?**

उत्तर : तू नामस्मरण कर म्हणजे तुला विविध अनुभव येतील. तूं नाम सोडलेस तरी नाम तुला सोडणार नाही. नामस्मरणाबरोबर तुझा अभ्यास सुरू ठेव. कोणाच्याही उपयोगी पड. कोणत्याही कामांत 'नामस्मरण' व्हावें. तें काम चांगले होईल.

**प्रश्न : नामस्मरण कसें करावें?**

उत्तर : ज्या देवाचे आपण नाम उच्चारतो तो उच्चार कानानें ऐकावा तुझ्या लहान वयांत तू एवढे जरी केलेस तरी पुष्कळ होईल.

**प्रश्न : कोणत्या देवाचे नामस्मरण करू?**

उत्तर : कोणत्याही देवाचे चालेल.

**प्रश्न : तू श्रीदत्तगुरूचें नाम घेतेस. मी श्रीराम नाम घेऊं**

उत्तर : अरे, सर्व देव एकच आहेत. एकाच परमात्म्याची ती वेगवेगळी

स्वरूपे आहेत. तू ज्या देवाचं नांव घेशील त्या देवतेच्या रूपांत तुला दर्शन होईल.

**प्रश्न : त्यासाठी एखादें स्तोत्र आहे काय?**

उत्तर : 'रामरक्षा' स्तोत्र आहे. पण ते वाचताना स्वतःसाठी एक पाट ठेवावा व समोर दुसरा पाट श्रीरामासाठी ठेवावा. तिसरा पाट उजवीकडे रिकामा ठेवावा. समोरच्या पाटावर अगरबत्ती लावून ठेवावी व नंतर वाचनास आरंभ करावा.

**प्रश्न : उजवीकडील पाट रिकामा का?**

उत्तर : श्रीरामभक्त श्री हनुमान रामनाम ऐकण्यासाठी मुद्दाम हजर असतात. त्या पाटावर हात जोडून ते बसतात; म्हणून तो पाट रिकामा ठेवावा.

**प्रश्न : झाडाखाली, माडाखाली स्नान करण्याबद्दल तू मला कां सांगतेस?**

उत्तर : तुला जशी तहान लागते, तशी तहान झाडांना लागते. कोठेतरी स्नान करून पाणी मोफत घालविण्यात काय अर्थ? झाडांना पाणी मिळाले तर ती टवटवीत होतील. तुला मधुर फळे मिळतील. त्या फळांच्या रूपाने देवाची कृपा आपणावर होत असते.

**प्रश्न : आपली आर्थिक परिस्थिती फार गरिबीची असताना जे लोक झाडें विकत घेण्यासाठी येतात त्यांना विकत कां नाहींस? भरपूर पैसा आपल्या हातीं येईल.**

उत्तर : सद्गुरु, त्या झाडांना जीव आहे. त्यांना भावना आहेत. दरवर्षी तुम्ही लहान असतांना त्यांनीच आंबे, फणस, काजू तुम्हास दिले व तुमचें जीवन घडलें. अरे, ती झाडे म्हणजे पूर्वीचे ऋषीमुनीच आहेत. एका जाग्यावर स्थिर बसून त्यांची तपश्चर्या सुरू आहे. अशा त्या वृक्षांना विकणे म्हणजे पोटच्या गोळ्याला विकणें असे मला वाटते. एकदा विकल्यानंतर आपल्या नजरेसमोर त्याला तोडले जाईल. असा पैसा घेण्यापेक्षा भिकारी राहण्यात मला आनंद वाटेल.

**प्रश्न : आई, कालच्या वादळांत 'मळी' विभागांत काही माड पडले आहेत. त्या माडांचे काय करावयाचे?**

उत्तर : जे पडले असतील त्यांना तसेंच पडून राहू द्यावयाचे नाही. त्या झाडांना मालक आहे. बिनवारशी ते तेथेच पडून राहिले तर त्यांना कसे वाटेल? त्यांना घरी आणून आपल्या बागांत ठेवावयाचे. नंतर जसा त्यांचा उपयोग होईल तसा करावयाचा. मालकाच्या

घरासाठी वासे म्हणून जरी उपयोग झाला तरी त्या कल्पवृक्षाला बरें वाटेल.

**प्रश्न : हल्ली मी कणकवलीस गेलो होतों. तेथे** भालचंद्र महाराज **म्हणून योगी** महाराज आहेत. त्यांना **तेथील** लोक नागडे महाराज **असेंही म्हणतात; कारण ते नग्नावस्थेंत असतात.** त्यांना पाहून **आलों. दर्शन घेतले.**

उत्तर : अरे जातांना काही घेऊन गेला होतास काय? की रिकाम्या हाती गेला होतास? सद्गुरू, ते महाराज नग्न होते म्हणजे बालकाच्या स्वरूपांत होते. त्यांना खाण्यासाठी काहींतरी न्यावयास हवें होते. एखाद्या पाळीव प्राण्याच्या संग्रहालयास भेट द्यावी तसा तू गेलास. या पुढे साधुसंतांकडे जातांना रिकाम्या हाती कधीच जाऊ नकोस, एखादे फळ, अगरबत्ती, कापूर घेऊन जावें. (आईचे ते शब्द आजपावेतो मी पाळले आणि पाळत आहे.)

**प्रश्न : आई, देवाला कसें ओळखावे?**

उत्तर : अरे, प्रथम तूं स्वतःला ओळख; म्हणजे देवाला ओळखशील.

**प्रश्न : स्वतःला कसें ओळखावें?**

उत्तर : स्वऽस्थ हो व निरीक्षण कर. तुझ्या वागण्याचें व त्या वागण्यामागें असलेल्या तुझ्या मनाचें.

**प्रश्न : निरीक्षण करूं म्हणजे काय करूं?**

उत्तर : तुझ्या मनांतील विचार, दुसऱ्यांबद्दल वाटणारें प्रेम अथवा द्वेष, अहंपणा, 'मी व माझे' यांत भरकटणारा कोण ते पहा. भीती, मोह, मत्सर यांच्याबाबतींत चित्त देऊन लक्ष ठेव म्हणजे 'मी' ला चिकटून असलेल्या सगळ्या वृत्ती हळू हळू कमी होतील. 'मी निरीक्षण करतो.' ही भूमिकाच रहाणार नाही. 'मी' विसरून जाशील व निरीक्षण प्रक्रियाच सुरू राहील. त्यांतूनच हळूहळू मन रिकामें होईल. मनाला शांती मिळेल. हळूहळू निरीक्षण प्रक्रिया विरघळून जाईल. या पातळीवर तुझ्या मनाच्या स्वच्छ आरशांत आत्मदर्शन होईल. परमात्माच तो.

**प्रश्न : पण त्या आत्मदर्शनांतून होणारे परमात्म दर्शन कसे ओळखावे?**

उत्तर : तूं सूर्यप्रकाश पाहिलास ना! त्याहीपेक्षा तेजस्वी प्रकाशदर्शन होईल. तो प्रकाश प्रखर असणार नाही; तसाच डोळयांना सहन होईल असा शीतल असेल. हा अंतराकाशांतील प्रकाश बाह्य प्रकाशाशी एकरूप होईल. तुझे अस्तित्व व बाह्य जगांतील विश्वाचे अस्तित्व तुला मुळीच

भासणार नाही. फक्त तुझ्या जाणीवेत संपूर्ण विश्व (तुझ्या सकट) विश्व ब्रह्ममय होईल. व शेवटी तुझ्या अशा निरामय जाणीवेला ना सीमा ना माप असेल. या परिस्थितीत तुझ्याशिवाय वेगळा देव नसेल. आत्म देवाशी तू एकरूप होशील.

**प्रश्न : अशा परिस्थितींत लौकिकदृष्ट्या मला लोक वेडा समजणार नाहीत ना?**

उत्तर : तुझी ही भूमिका क्षणभर राहील. पुन्हां पूर्ववत् तू आनंदात व उत्साहांत मूळ भूमिकेवर येशील? तुझा हा छंद वाढत जाईल व देव कसा ओळखावा. हा प्रश्न शिल्लक उरणार नाही.

**प्रश्न : आई, तू जास्त शिकलेली नसताना तू ज्या शब्दांत हे सांगते आहेस ती शब्दसंपत्ती कशी संपादन केलीस.**

उत्तर : शब्द व अर्थ पहात मी बसत नाहीं. माझे भाव व अर्थ शब्द घेऊन पुढे धावतात. मी कांही बोलत नाही.

**प्रश्न : परमात्मा एकच आहे; तर भक्त अनेक देवतांना कां भजतात?**

उत्तर : अनेकत्वांत एकत्व ते पहातात.

अनेक वेळां अशी प्रश्नोत्तरे होत. माझ्या नामस्मरणाशी व भावनाशी मिळतीजुळती उत्तरे ऐकून मन आनंदाने उचंबळून येत असे.

■ □ ■ □ ■

# कृष्णाकाठीं

आम्हा दोघां बंधूंच्या नोकरीच्या कालांत आईचे वास्तव्य तांबोसे येथे गोव्याला होते. त्या कालांत ती चातुर्मास पाळत असे. वटसावित्री, नागपंचमी, मंगळागौरी, संकष्ट चतुर्थी (बाराही महिने), सोमवार शिवपूजा, कृष्ण जन्माष्टमी, हरितालिका, गणेशचतुर्थी, ऋषीपंचमी, नवरात्रपूजा, तुलसीविवाह पूजा, ब्राह्मण सुवासिनी पूजा व भोजन संकल्प इत्यादि कार्यक्रम पार पाडत असे. महत्त्वाच्या दिवशी देवांना नैवेद्य दाखविताना नैवेद्य समर्पणाचे मंत्र म्हणून योग्य ताटांत नैवेद्य ठेवून ते ताट अगर पात्र भूमीवर चतुष्कोणाकृती पाण्याचे मंडल काढून त्यावर ठेवत असे आणि त्यावर तुलसीपत्राने उदक प्रोक्षण करून तुलसीदल त्या नैवेद्यावर ठेवत असे व दुसरें एक तुलसी दल उजव्या हातांत घेऊन डावा हात आपल्या दोन्ही नेत्रांवर ठेवून स्वस्थ चित्तानें प्राणाहुति मंत्रांनी नैवेद्य अर्पण करत असे. नोकरीच्या बाबतींत मी प्रथम बान्दा (सावंतवाडी संस्थान) येथे कमाविसदार पेटा ऑफीसमध्ये व नंतर सावंतवाडी, रत्नागिरी येथील पोस्ट ऑफिसमध्यें नोकरी करून पुढे मुंबईच्या तार ऑफिसमध्ये फाऊन्टनला टेलिग्राफिस्ट म्हणून चार वर्षे काम केले. दौलत सावंतवाडीला शिक्षक म्हणून कामास होता. ४-५ महिन्यांनी तो मुंबईस आला. रात्रपाळी व दिवसपाळी याचा माझ्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झाला. मुंबई सोडून मी तांबोसे येथें आलो. अखंड नामस्मरणांतून मी बरा झालों. व आजगांवपासून १ मैल अंतरावर शिरोडा येथे माझी शिक्षक म्हणून नेमणूक झाल्यानंतर तेथें नोकरीच्या गांवी गेलो. पुढे बाहेरून परीक्षेस बसून मी बी. ए. झालों. रत्नागिरीस सरकारी बी. एड. कॉलेजमधून मी बी. एड. झालों. पुढे वरिष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी म्हणून सावंतवाडी, कणकवली, देवगड, रत्नागिरी येथे जावें लागलें. या कालांत बिऱ्हाड सावंतवाडीस असल्यानें

तांबोसे येथे सुट्टीच्या दिवशी मुलें व पत्नी जात असत व तिला तेवढीच सोबत होई. आईच्या अखेरच्या कालांत अठरा महिने आई सावंतवाडीस माझ्याकडे होती. 'मला हॉस्पिटलमध्ये कधीच नेता नये' या अटीवरच ती तांबोसे येथून सावंतवाडीस आली होती. तिच्या शरीरांतील रक्त हळूहळू कमी होऊ लागले. अनेक ख्यातनाम डॉक्टरांस बोलावून तपासणी करून घेतलीं औषधोपचार केले. काही काळ गुण येई. पण एक दुखणे बरें झाले तर दुसरें दत्त म्हणून हजर. वृद्धापकालांतील आजार म्हणजे आजारी माणसावर आलेली ती एक आपत्तीच असते. तिच्या पायांतून वात चढे. रात्रौ तिला वाताचा फार त्रास होई. विविध तेले पायाला चोळल्यानंतर तिला आराम वाटे. रात्रौ ७-८ वेळां तिला हा त्रास होई व तेवढ्याच वेळा मला उठून पाय रगडण्याचे काम करावें लागे. 'प्रारब्धांतील भोग आपण भोगून संपवणार आहे' असें ती म्हणावयाची. असे दिवस जात असतांना १८ मार्च १९७९ हा दिवस उजाडला. त्या दिवशी आईने माझ्या मदतीने स्नान केले व ती खुर्चीवर येऊन बसली. तिचे नामस्मरण सुरू होते. नंतर झोपण्याच्या खोलीत जाऊन ती कलंडली. त्या दिवशी तांबोसे गांवात वार्षिक धार्मिक कार्य होते. त्या कार्यासाठी आईने आपला भाऊ (माझा मामा) व माझ्या पत्नीला नैवेद्याचे काम करण्यासाठी त्या दिवशी सकाळी पाठविले. मला जवळ घेऊन ती म्हणाली, 'सद्गुरू, तूं रडू नकोस..... आज मी जाणार(' मला तिचे सांगणे खरे वाटले नाहीं. संध्याकाळी आई म्हणाली, 'सद्गुरू, मला नेण्यासाठी देव आले आहेत.' तेवढ्यातच देवाचें नैवेद्याचें काम आटोपून मामा व माझी पत्नी सावंतवाडीस येऊन पोहोचली. आईने थोडा नैवेद्य खाल्ला व ती झोपी गेली. रात्रौ ११ वाजतां मी अर्धवट झोपेंतच कलंडलों. ११-१९च्या दरम्यान उचकीसारखा आवाज आला. मी जागाच होतो. मी उठलों तर आईचे तोंड वेडेवाकडे दिसू लागले. जपाची माळ तिने माझ्या हाती दिली. आई माझा अखेरचा निरोप घेत असल्याची मला कल्पना आली. कारण माझ्या वडिलांच्या निधनसमयी मी हा प्रकार पाहिला होता. लगेच शेजारच्या खोलीतून संजीव व विद्या व प्रफुल्ल धावून आलीं. तुळसीपत्रानें एक चमचा पाणी तिच्या तोंडात घातले. आईची अखेरची ताटातूट माझ्या मांडीवरच असतांना झाली....

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

वडिलांप्रमाणेंच!

चौथ्यापांचव्या दिवशी आईचा रक्षाकलश घेऊन मी व मामा नरसोबाच्या वाडीस पोहोचलों. रक्षाकलश सबंध प्रवासात माझ्या मांडीवरच होता. मधून मधून तो मामा घेत असे. आईने मला 'रडूं नको' असे सांगितले असलें तरी नरसोबावाडीस बनांत गाडीतून उतरतांना माझे दोन्ही डोळे अश्रूंनी डबडबून आले. त्या दिवशी रक्षा-कलश एका पुरोहिताच्या घरी ठेवून तेथे आम्ही मुक्काम केला व दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजतां कृष्णा पंचगंगा संगमावर जाण्यासाठीं निघालों. पुरोहितांनी आम्हा दोघांना (मामांना व मला) मंदिराच्या मागून पुढे व्हा असे सांगितले. आम्ही संगमावर पोहोचलों. तेथें माझ्या अगोदर एक बाई बसलेल्या होत्या. ओलेत्याने ..... केस भिजलेले. नुकत्याच स्नान करून त्या वर आलेल्या असाव्यात असे वाटले. त्या बाईनी आम्हाला 'हातपाय धुऊन घ्या. मागाहून पुरोहित काय सांगतील ते ऐका' असे सांगायला व पुरोहित तेथे यायला एकच गांठ पडली. पुरोहितांनी काही मंत्र म्हणून मला तें रक्षापात्र पाण्यांत सोडावयास सांगितले. डावीकडे नुकताच सूर्योदय होत होता. उजवीकडे स्वच्छ निळें आकाश व पाठीमागें मामा व पुरोहितांशिवाय कुणीच नव्हतें. मग त्या उपासिका बाई कोठे गेल्या असाव्यात हा विचार माझ्या मनांत घोळत असतांना मी रक्षाकलश जड अंतःकरणाने पाण्यात सोडला. चमत्कार असा की, तो कलश घेण्यासाठी पाण्याखालीच जलदेवतेचे दोन्ही हात पुढे आलेले मी संपूर्ण जागृतावस्थेत पाहिले. चमत्कारांवर विश्वास ठेवणे मला आवडत नसे. पण तोंडातून 'जय..... कृष्णा माते' असे उद्‌गार बाहेर पडले. माझ्यावर पाण्याचा शिडकावा झाला. खरेखुरे तीर्थस्नान झाले.

आता त्या दत्तोपासक बाई, त्यांची तेथील क्षणभरची उपस्थिती, रक्षाकलश पाण्यांत झेलून घेणारे तिचे हात व माझ्या तोंडून बाहेर पडणारे उद्गार.... या सर्वांचा मला उलगडा होऊ लागला. जी कृष्णाबाई संकटकालांत आईकडे मधून मधून येत असे तीच तर नसेल ना! माझी मान खाली होऊन चुकली व आईच्या उद्गारांची आठवण झाली. 'सद्गुरु! कृष्णाबाई कोण ते मागाहून तुला कळेल व चमत्काराची प्रचीती
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

येईल' त्या तिच्या बोलण्याचा प्रत्यय आज आला. आईच्या भावविश्वांत श्री दत्तगुरुइतकाच कृष्णाबाईचा प्रवेश झाला होता.

सदर चमत्कारबाबत मी कोठेच काही बोललो नाही. तसेच 'कृपेची साऊली माऊली माझी' या पुस्तकांतही उल्लेख केला नाही. माझा अनुभव व प्रचीती स्मृतीसुमने म्हणून हृदयांतच जपून ठेवली.

■ □ ■ □ ■

# लेखननिर्मिति

## पुस्तकें, स्तोत्रें यांची निर्मिती

एक दिवस मी असाच बसलों असताना आईच्या जुन्या आठवणी माझ्यासमोर चलत् चित्रपटासारख्या सरकू लागल्या. त्या आठवणीतून मला बाहेर पडतां येईना. फार फार उदासीन झालों. काय करावें हे न समजेना. ह्या आठवणींना वाट करून देण्याचा एकच उपाय म्हणजे त्या दुसऱ्या कुणाला तरी सांगणे. मी लगेच लेखणी व कागद उचलला व जशा जशा त्या आठवणी माझ्यासमोर येतील त्यांना शब्दरूप दिलें. चार दिवसांत जे काय लिहिलें गेले ते पुस्तकरूपाने पाच वर्षांनी प्रसिद्ध झालें. पुस्तकाचे नांव कृपेची साऊली - माऊली माझी' असे ठेवले. सदर पुस्तकाच्या बाबतींत 'गोमंतक', बेळगांवचा 'तरुण भारत' सावंतवाडीतील दैनिक 'नवकोकण' वगैरे दैनिकांनी चांगले अभिप्राय दिले. पुणे येथील श्री. पु. ल. देशपांडे व साहित्य संमेलनाचे भावी अध्यक्ष श्री. मधु मंगेश कर्णिक यांनीही पत्रे पाठवून धन्यवाद दिले. सदर पुस्तकाचे प्रकाशन सिंधुदुर्ग साहित्य संघाच्या खास कार्यकारिणीने केले.

माझा नामजप १९४८ पासून सुरू होता. त्या जपातून मला जे समाधान प्राप्त झालें त्यातूनच मी माझ्या पुढील आयुष्याच्या चढउतारांना निर्भयपणें तोंड देऊ शकलों. बांदेकरांच्या घरांत आम्ही होतो. सावंतवाडीतील उभ्या बाजारांत तीन लहान खोल्यांचें तें घर होतें. मी तीन वर्षे अगोदरच सेवानिवृत्ती घेतली होती. सौ.विद्या शिक्षिका असल्याने शाळेंत जावयाची. चि. प्रफुल्लदत्त मुंबईस एका बँकेत होता. चि. संजीव लहान प्रमाणांत (लघुउद्योग) धंद्यात गुंतला होता. मला भरपूर वेळ मिळे. दरवाजे बंद करून मी खोलीत दोनदोन, तीनतीन तास नामस्मरण करत असे. एक दिवस नामस्मरण आटोपून गाढ झोपी

गेलो. काही वेळ गेल्यानंतर थंड वावटळीच्या भोवऱ्यांत मी सापडलों आहे असें वाटले. साधारण जाग आली तरी डोळे उघडवेनात. अंगावरून पांघरूण घेऊन व दोन्ही पाय आखडून तसेच पडून रहावेसे वाटले. अर्धवट झोप व अर्धवट जाग या द्विधा परिस्थितींत पावसचे स्वरूपानंद स्वामी स्पष्टपणे ज्ञानमुद्रेच्या स्वरूपांत दिसले. बाहेर वादळीवारे घोंघावत आहेत याची जाणीव होत होती. स्वामींना नमस्कार करून खिडकी उघडली तर बाहेर शांत वातावरण असल्याचें आढळले. मला कळेना हा सर्व प्रकार काय आहे तो! १९७३ साली स्वामींची व माझी अखेरची भेट झाली होती. तत्पूर्वी १९६० साली सीनिअर ट्रेनिंगला असताना मी प्रत्यक्ष पावसला भेट घेतली होती. आज मात्र स्वामींनी माझ्या खोलीत येऊन मला काय संदेश दिला तो मला समजला नाही. मात्र त्याच आठदहा दिवसांत 'सोऽहं ध्यानतरंग' हे छोटें पुस्तक लिहून झालें.

त्या काळांत मी फार आजारी झालों. मुंबई विद्यापीठाचे मराठी विभागाचे प्रमुख व संतवाङ्मयाचे एक अभ्यासू श्री. व. दि. कुलकर्णी सावंतवाडीस आले होते. त्यांना माझ्या आजाराबद्दल समजताच ते व त्यांची पत्नी रात्रौ आठ वाजतां भेटावयास आली. सोबत श्री. आठलेकर ('साखरमाणसे' चे लेखक) होते. मी झोपूनच होतों. माझे 'सोऽहम् ध्यानतरंग' हे पुस्तक अथपासून इतिपर्यंत वाचून 'सारे रुजले आहे' असे त्यांनी सांगितले. 'मधून मधून लिहीत रहा' असें ते म्हणाले.

आतां आम्ही सावंतवाडीस श्री दाजी पई यांच्या घरांत (कॉलेज रोडवर) रहावयास आलो. बाजूला मोतीतलाव होता. राजवाड्याचे प्रतिबिंब मोती तलावांतील पाण्यांत शोभून दिसत होते. सोबत माडाची झाडें व केशवसुतांचे आंब्याचे झाड या परिसरातील एक आकर्षण होतें. माझ्या नवीन बिऱ्हाडाच्या खिडकीतून हे सर्व मला दिसावयाचे. पावसाळ्यांत तुडुंब भरलेला तलाव व त्यांतील पाण्यावर खेळणारे तरंग माझ्या भावी जीवनातील चैतन्यलहरींना एक फार मोठें वरदान वाटावयाचें. दरवाजातून बाहेर पडल्यानंतर समोर हायस्कूल, पाठीमागे वृक्षांच्या छायेतील महाविद्यालय म्हणजे मला सरस्वतीचा आशीर्वाद वाटावयाचा. डावीकडील नरेन्द्र पर्वत वृक्षवेलींमुळें इंद्राच्या उपवनाची साक्ष देत होता. एका रमणीय जागेंत मी रहात होतों. निसर्गसंपत्तीनें मी श्रीमंत झालों होतों. हे भाग्य थोड्यांच्याच वाटेला येतें. मी फार

भाग्यवान होतों. आजारी अवस्थेंतही माझे दिवस आनंदात जावयाचे. या नवीन बिऱ्हाडाच्या खिडकीकडे माझी कॉट असावयाची.

एक दिवस दुपारची वेळ होती. मी झोपलों होतों. गाढ झोप आलेली होती. झोपेंतच घरघरणाऱ्या मोटारीचा आवाज माझ्या हृदयांतून येऊं लागला. त्या आवाजाबरोबर नाथपंथीय देवेंद्रस्वामी व सोबत दत्तावतार श्री टेंबेस्वामी यांची प्रतिमा एक क्षणभर दिसून आली. आवाजाची कमी कमी होत जाणारी तीव्रता व सोबत दोन्ही संतांच्या प्रतिमांची होत जाणारी अस्पष्टता या दोन्ही घटनांची एकवाक्यता एकाच वेळी घडून आली. श्री टेंबेस्वामींनी कौपीन धारण केलेली होती व हातांत दंड होता. हें स्वरूप पहात असतांनाच माझ्या कानांतून कांही ओव्या ऐकल्या. त्या जशाच्या तशाच लिहून काढण्यासाठी मी उठून बसलो व शेजारींच असलेल्या कागदावर टिपल्या. एखाद्या शिलालेखावर त्या ओव्या कोराव्या तसाच प्रकार माझ्या कानाच्या पडद्यावर झाला. त्या ओव्या मी मुद्दाम उद्धृत करीत आहे.

*'महाराष्ट्रीं कोकण क्षेत्रीं।*
*सह्यगिरी जल पात्रीं।*
*माणगांवी पुत्र अत्री।*
*तेजोरुपें प्रकाशती'।।१।।*

प्रस्तुतच्या चार ओव्या आरंभी लिहून नंतर १३६ ओव्यांचे 'दत्तावतार टेंबेस्वामी चरितामृत' नांवाचे स्तोत्र पूर्ण झालें. पहिल्या चार ओळी टेंबे स्वामींजी सुचविल्या कीं नाथ संप्रदायांतील देवेन्द्रस्वामींनी सुचविल्या हें कोडें मला अद्याप सुटलेलें नाही. या स्तोत्राला अनेकांकडून मागणी येऊ लागली ही महाराजांची कृपाच म्हणावयाची.

गोंधवलें येथील ब्रह्मचैतन्य श्री गोंधवलेकर महाराज एक महान रामभक्त होते. त्यांच्या प्रवचनांतील सार मी ओवीबद्ध केलें व 'ओवीनामामृत सार' ही छोटी पुस्तिका तयार झाली.

सावंतवाडीस असतांना 'स्व-स्थ'व्हा, 'स्व'ला पहा स्थितींत असतांना मनांत वेगवेगळी प्रश्नोत्तरें येऊ लागली 'आत्मसंवाद' हें छोटें पुस्तक त्यांतूनच लिहिलें गेलें.

मध्यंतरी प्रोस्टेट्र ग्लँड वाढल्यामुळें सावंतवाडीच्या हॉस्पिटलमध्ये चौदा दिवस होतों. त्यावेळीं माझा ग्रामदेव 'श्री देव वेतोबा' व म्हापण गावची 'श्री देवी सातेरी' माझ्या संरक्षणासाठी धावून आली. मी

जागृतावस्थेंत असतांना प्रकाशरूपांत मला त्यांचे दर्शन घडलें. महाराष्ट्राचे कॅबिनेट मिनिस्टर श्री. भाई सावंत मला पाहण्यासाठी हॉस्पिटलमध्ये आले. त्यांनी प्रमुख वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून माझ्याकडे आले व 'तुम्ही मुंबईस या' असें मला सांगितलें. दुसऱ्या दिवशीं माझे मुंबईस जाणें घडलें. हिंदु कॉलनी माटुंगा येथील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डॉ. अजित फडके यांनी ऑपरेशन केलें. ऑपरेशनला चार तास लागले. रक्तस्राव पुष्कळ झाल्यानें आठ महिन्यांनी अपूर्ण राहिलेले ऑपरेशन पूर्ण करण्यांत आलें. या सर्व कालांत 'श्री देव वेतोबास्तवन' व 'सातेरी देवीस्तोत्र' ही दोन स्तोत्रे लिहिली गेलीं. आंध्र व कर्नाटक यांच्या सीमेवर रायचूरपासून जवळ 'मंत्रालय' नांवाचें एक जागृत देवस्थान आहे. तेथें श्री राघवेंद्र स्वामी नांवाचे एक थोर योगी होऊन गेले. तें एक जागृत देवस्थान आहे. श्री टेंबे स्वामीबरोबर स्वप्नदर्शनांत ज्या नाथपंथीय देवेन्द्रस्वामींनी मला दर्शन दिलें, त्या देवेन्द्रनाथांचे गुरु राघवेंद्रस्वामी होत. (हें मला स्तोत्र लिहून झाल्यावर समजलें) हें स्तोत्र मुंबईस लिहून पूर्ण झाले. पुण्याचे श्री स्वामी यांचेही स्तोत्र असेंच अंतःप्रेरणा होऊन लिहिलें गेलें आहे. या सर्व लेखनांत मी काहीच केले नाही. महाराजांनी सर्व करून घेतलें अशी माझी धारणा आहे. जसें सुचले तसें लिहीत गेलों. कांही लेखन प्रसिद्ध व्हावयाचें आहे. सेवानिवृत्त होईपर्यंत या कार्याची मला कांहीच कल्पना नव्हती. ईश्वरानेंच तें करून घेतलें. मी केवळ निमित्तमात्र आहे. 'भाव माझ्या अंतरीचें' नावाचा कवितासंग्रह (पूर्वाश्रमांत लिहिलेल्या कविता) मध्यंतरी प्रसिद्ध झाला. 'हे भगवन्!' हा कवितासंग्रह १९९२ जानेवारीमध्येच प्रसिद्ध झाला.

■ □ ■ □ ■

# साधुसंतांच्या भेटी

## साटम महाराज

१९३३ सालांत दाणोलीचे साटम महाराज बांदे येथें आले होते. त्यांच्या भक्तांपैकी अनंत केसरकर मला आठवतात. मी त्यावेळीं नऊ वर्षांचा होतों. आखुड हातांची पायघोळ भगवी कफनी महाराजांनी घातलेली होती. रंग काळासावळा होता. डोकीवरील केस विरळ होते. ते अवलीयासारखे वागत. कधीं कधीं नग्नावस्थेत रहात, कधीं कधीं शिव्या सुद्धा घालत. केव्हां केव्हां दगड घेऊन मागे लागत. सावंतवाडीचे राजे बापुसाहेब त्यांचे परम भक्त होते. त्यांना कांही सिद्धी प्राप्त झालेल्या होत्या.

## मियाँसाहेब

हे धर्माने मुसलमान असले तरी हिंदुसंस्कृतीचा त्यांच्यावर परिणाम झालेला होता. संस्थानी काळांत ते बांधकाम खात्यांत होते. एक दिवस १९४३ मध्यें बळवंतराव सबनीस यांच्या घरीं मी खेळत असतांना तेथें ते आले. चालतां चालतां माझ्या पाठीवरून त्यांनी हात फिरवला. 'अच्छा हो जायेगा' असें ते म्हणाले. सावंतवाडीस कोलगांव येथें त्यांची समाधी आहे. प्रत्येक गुरुवारीं भाविक हिंदु-मुसलमान तेथें जातात. त्यांचा भक्तवर्ग त्या भागांत आहे.

## श्री सावंत महाराज (सावंतवाडी)

हे पोलीस खात्यांत होते. दत्तभक्त. सेवानिवृत्तीनंतर सावंतवाडीस

त्यांनी छोटे घर बांधून भक्तीमार्गाच्या बाबतींत अनेकांना मार्गदर्शन केले. सध्यां ते आजारी असतात. त्यांना काही मंत्रतंत्रादि ज्ञान असल्याचें बोललें जातें. दत्तउत्सव प्रत्येक वर्षीं साजरा होत असतो. मला त्यांनी 'एकनाथी भागवत, भक्तीविजय वगैरे ग्रंथ वाचा' असें सांगितले.

## श्री रामकृष्ण महाराज (मळगांव)

श्री रामकृष्ण महाराज (मळगांव) यांचा मठ गेलीं १० वर्षें मळगांव येथे ब्राह्मणवाडींत असून ते त्या ठिकाणी दत्तभक्तीत रममाण झाले होते. तेथें दत्तमूर्ती असून सर्व प्रकारचें धार्मिक कार्य चालतें. गौरवर्ण, दाढी, आध्यात्मिक ज्ञान, तंत्रज्ञान यांच्या जोरावर त्यांना बराच भक्त-वर्ग मिळाला होता. बऱ्याच वेळां मी तेथे गेलों असून त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानाची प्रचीती आलेली आहे. एकदोन वर्षांपूर्वीं त्यांचे महानिर्वाण झाले.

## रामानंदस्वामी, दाभोली मठ

काका खानोलकर तथा रामानंदस्वामी यांचा लहानपणापासून नामस्मरणाकडे ओढा. प्रपंचांत लक्ष कमी. पेढीवर ते कारकून म्हणून काम करावयाचे. आमच्याच नातलगांपैकी ते असल्यानें केव्हातरी आमच्याकडे येणे-जाणे होत असे. अखंड नामस्मरणांत ते असावयाचे. ते गुरुचरित्राची पारायणें करीत. पांगिऱ्याचे महाराज यांच्याकडे त्यांचे वास्तव्य होतें. शिवडांव येथे तेथील मंदिरांत त्यांचें काही काल वास्तव्य होते. दाभोली मठाचे स्वामी होण्यापूर्वी माझ्या बिऱ्हाडी एक दिवस होते. नामांचें महत्त्व किती मोठें आहे याची कल्पना त्यांनी मला स्वतःच्या अनुभवाच्या आधारें दिली.

## म्हापणचे दत्तभक्त काका ठाकूर

मी १९६० ते ६१ मध्यें म्हापणला शिक्षक म्हणून असतांना दत्तमंदिरांत जात असे. तेथे श्री दत्तभक्त काका ठाकूर यांचें दर्शन घडलें. मुंबईपासून अनेक भक्तलोक त्यांच्या दर्शनाला येत असत.

## योगीराज रामभाऊ सामंत (रत्नागिरी)

मी रत्नागिरीस ट्रेनिंगला असतांना ज्या ठाकुरांकडे रहावयास होतों, (रेगे वकील कंपाऊन्ड) त्या श्रीमति ठाकूरबाईंचे हे बंधु. दर शनिवारी अगर रविवारी त्यांची भेट होई व अध्यात्म विषयावर चर्चा चाले. योगीराज सामंतांनी ब्रह्मसमंध व पिशाच्चबाधा झालेल्या अनेकांची मुक्तता केली. शिवाजीनगर येथें त्यांनी रत्नागिरीला आनंद- मूर्तींचा मठ स्थापन केलेला आहे.

## श्री गाडगे महाराज

बांदा येथें १९४० पूर्वी त्यांचें दर्शन घडलें. सामाजिक सुधारणा करण्याकडे त्यांचें लक्ष होतें. सोप्या पद्धतीने त्यांचे कीर्तन होई. अंधविश्वासाने पशुपक्ष्यांची होणारी हत्या त्यांना पसंत नव्हती. कर्ज काढून सण करूं नका, असें त्यांचें सांगणें होते. जमलेला पैसा धर्मशाळा बांधण्यांत ते खर्च करीत. पुढें सावंतवाडी व रत्नागिरी येथे त्यांची कीर्तने ऐकलीं.

## दत्तभक्त नरहरी आजगांवकर (मोरगांव)

यांच्या घरी दर गुरुवारी अनेक भाविक येत असत. अंगातील वारें ते काढून टाकत. एक दिवस आमच्या घरी 'श्री गुरुदेवदत्त' असें म्हणत ते येऊन पोहोचलें. त्या दिवशी संकष्ट चतुर्थी होती. त्या रात्री त्यांनी स्वलिखित गुरुचरित्र (६२ अध्यायांवरील सार) म्हणून दाखविले. मधून मधून ते सावंतवाडीस येत, त्यावेळीं आमच्या बिऱ्हाडी (पै यांचे घर) येत असत. ते साक्षात्कारी होते. १९९० सालीं ते स्वर्गवासी झाले.

## केशवस्वामी तथा अण्णा महाराज, (मुंबई)

अण्णा महाराज, मुंबई यांची भेट १९९० साली माझ्या बंधुमुळे झाली. श्री स्वामीसमर्थांचे उपासक. वृत्तीनें ते विदेही म्हणावयास हरकत

नाहीं. ते नामजप देतात. स्वतः ते सतत स्वामी समर्थ नामाशी अनुसंधान ठेवून असतात. त्यांचे वय १०० च्या आसपास आहे. त्यांच्या आशीर्वादाचा हात फिरताना कुणाचेही अष्ट सात्त्विक भाव जागृत झाल्याशिवाय राहणार नाहींत.

## निसर्गदत्त महाराज, मुंबई

ज्ञानमार्गाची दीक्षा ते देत असत. १९८४-८१ सालीं त्यांचे महानिर्वाण झालें. रोज सायंकाळी ४ ते ६ उपासकांच्या प्रश्नांची व शंकांची उत्तरे देऊन त्यांचे समाधान करत असत. मुंबईस आलों म्हणजे मी त्यांच्याकडे जात असें. १० वी खेतवाडी येथें ते राहात असत.

स्वरूपवाणी, आत्मबोध, बोधप्रकाश, आत्मप्रकाश, स्वरूपबोध वगैरे पुस्तकें म्हणजे ज्ञानेच्छु लोकांना मेजवानीच आहे. भगवान रमण, जे. कृष्णमूर्ती यांच्या आठवणी करून देणारे विचार श्री निसर्गदत्त महाराज व्यक्त करतात. ते कोणत्याही ग्रंथाचा आधार घेत नसत. ते आत्मयोगी होते.

## श्री राऊळ महाराज, कुडाळ

मी कुडाळला शिक्षक असतांना १९१६-१७ पासून यांना ओळखतो. ते कुडाळी बोलीभाषेंत बोलत. त्या काळांत ते इतके प्रसिद्ध नव्हते. मळकट धोतर, सदरा व तुळतुळीत डोकें तसेंच भक्कम देह असलेले राऊळबुवा त्या काळांत बाजारातून व आसपासच्या भागांतून फेऱ्या मारीत असत. पुढे पुढे त्यांचा बोलबाला पुष्कळ झाला. ते एक सत्पुरुष म्हणून ओळखले जाऊ लागले. याची वस्तु घेऊन दुसऱ्याला देणें ही बाब तर नित्याचीच होती. म्हापणला मी शिक्षक असतांना शाळेंत आले. 'मास्तरा, तूं किती दिवस मास्तरकी करतलय?' 'वरच्या जागेवर जावचे दिवस येतसत.' असे बोल बोलत ते सर्व वर्गांतून फिरले व जसे आले तसे निघून गेले. १९६१ मध्ये मीं सावंतवाडीस बदलून गेलो. १९६६ सालीं मला रत्नागिरी येथें निवडमंडळाने बोलावून 'ग्रामपंचायत व समाजकल्याण विस्तार अधिकारी' म्हणून निवड केली. माझी

शाळाखात्यांत सर्व नोकरी झाल्यानें मला 'शिक्षण विस्तार अधिकारी' म्हणून प्रमोशन हवें होते. नवीन प्रमोशन 'नियुक्त' स्वरूपाचे असल्याने मागील नोकरीत खंड पडणार अगर कसें याबाबत खात्याकडे विचारणा करतांच रत्नागिरी जिल्हा परिषदेने महाराष्ट्र गव्हर्नमेंटकडे माझा अर्ज पाठविला. पेन्शनसाठी मागील नोकरी धरली जाईल असें सरकारकडून कळत असतांनाच शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून प्रमोशन मिळालें.

सावंतवाडीस वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून काम करत असतांना कोलगांवला शाळेस भेट देऊन एस्. टी. ची वाट पहात होतों. गाडी थांबवली. आंत बसलों तर बाजूला पगडी घातलेले राऊळ महाराज. कंडक्टर पैसे घ्यावयास तयार होईना. त्यानें फक्त तिकीट फाडून दिलें. आता काय करावयाचें याचा विचार करत असतांना गाडी सावंतवाडीस आली. 'चल मास्तरा.... माझ्याबरोबर गपचुप चल.' ते पुढे व मी सोबत चालूं लागलों. श्रीराम वाचनमंदिराकडून पुढे राऊत आणि कंपनीजवळून तसेच जाऊं लागलो. राऊळबुवा आनंद भुवन-मध्यें जवळजवळ घुसले व काउन्टरवर बसले. 'मंगेशा, ह्या सगळ्यांक होया तितक्या खावक घाल. ढेकर येऊक होयो.' पूर्वीच बसलेले दोघेतिघे व मी मिळून चारजण होतों.' तोपर्यंत राऊळ महाराज काउन्टरचा ड्रॉवर उघडून पैसे मिळतील तसे घेऊन आपल्या खिशांत घालत होते.

आम्हाला राऊळ महाराजांनी दिलेला हा प्रसाद माझ्या प्रमोशन नंतरचा होता. त्यांचा जन्म पाच ऑक्टोबर १९०९ रोजीं पिंगुळी येथे झाला. तुकोबांचे अभंग त्यांना मुखोद्‌गत होते. सोलापूरचे आत्मज्ञानी योगी सत्पुरुष श्री बाळकृष्ण महाराज यांची गाठ पडतांच राऊळ बुवांच्या आचार-विचारांत एकदम बदल झाला. त्यांनी अनेकांना सन्मार्गाला लावलें. त्यांच्या आज्ञेने पिंगुळी येथे दत्तमंदिर बांधण्यात आलें.

## स्वामी स्वरूपानंद, पावस, रत्नागिरी.

१९५९-६० मध्ये मी रत्नागिरीस सिनिअर ट्रेनिंग कोर्ससाठीं होतों. त्या काळांत पावसला स्वामीदर्शन घडलें. ते देसाई यांचे घरांत होते.

पडवींत डावीकडील खोलींत एका रुंद बाकावर ते बसत. अनेक साधक लोक त्यांना भेटावयास येत. त्यामुळें बाहेर थांबावें लागे. खिडकीसमोर मी बाकावर बसलों होतों. माझ्या बाजूला श्री. जोशी (विठ्ठलराव) बसले होते. त्यांच्याशी आध्यात्मिक चर्चा होत असतांना स्वामीनी मला खोलीत बोलाविले. श्री. जोशी माझ्यापूर्वी तेथे आले असल्यानें मी त्यांना जावयास सांगितले. ते म्हणाले, 'स्वामीनी तुम्हास बोलाविले असल्याने तुम्हीं चला.' मी आत गेल्यानंतर "तुम्हीं नरसोबावाडीस होता, तेथील माधुकरीचा तुम्हीं आस्वाद घेतला आहे ना? तुमच्यावर दत्तमहाराजांची कृपा आहे. तुमचे गुरु दत्तगुरु आहेत." त्यांनी माझ्या हातावर खडीसाखर ठेवली. एक खारीक होती. 'तुमच्या आईची सेवा तुमच्या भागे आहे.' असे ते म्हणाले. माझ्या बाजूस श्री. जोशी बसले होते. तेच पुढे पुणे येथे जोशी महाराज म्हणून ओळखले जाऊं लागले. परमार्थांतील एक जाणकार व अधिकारी व्यक्ती म्हणून ते ओळखले जाऊ लागले.

श्री स्वामी स्वरूपानंदांची व माझी १९७३ सालीं भेट झाली. ते अत्यवस्थ होते. पायापासून गळ्यापर्यंत शुभ्र वस्त्र होतें. डोकीवर पांढरा स्वच्छ रुमाल (साईबाबांसारखा) बांधलेला होता. डोळे व तोंड उघडे ठेवलें होते. त्यांच्या खोलीत (श्री. देसाई यांच्या घरांत) भाविकांची गर्दी ओळीने उभी होती. माझा क्रम येतांच त्यांनी आपलें डोकें उचलण्याचा प्रयत्न केला व उजव्या हातानें आशीर्वादाचा हात वर केला.

श्री स्वरूपानंदस्वामींचा जन्म १९ डिसेंबर १९०३ रोजी झाला. रामचंद्र विष्णू गोडबोले त्यांचे नांव. १९२३ सालीं पावसगांवी 'स्वावलंबन आश्रम' स्थापन केला. प्रत्येकाने आपल्या मूळच्या सच्चिदानंद स्वरूपाची जाणीव ठेवून सोऽहं भावाने सर्व प्राप्त कर्तव्यें उत्साहाने अनासक्त बुद्धीने व ईशपूजन भावानें करावीं असें स्वामी सांगत. १९३४-३९ सालापासून श्री स्वामींची प्रकृती क्षीण होती. पुण्याचे श्री बाबा महाराज वैद्य नामक सद्‌गुरूंनी त्यांना परमार्थ साधनेची दीक्षा दिली.

## श्री गुळवणी महाराज, पुणे

१९६८ व ७० साली श्री गुळवणी महाराज, वासुदेवानंदाश्रम, कर्वे रोड येथे भेट झाली. महाराज प्रसन्न मुद्रेनें उठून बसले.

त्यावेळी त्यांचे समोर अनेक मुमुक्षु बसले होते. महाराजांसमो ज्ञानेश्वरींचे वाचन सुरू होतें. उशीवर डोके ठेवून ते ऐकत. वासुदेवानं निवासाच्या माडीवर त्यांचा शिष्यवर्गाला भेट देण्याचा व वाचन ऐकण्याचा कार्यक्रम चाले. खाली कीर्तन-भजनादि कार्यक्रम चाले. ते गुरुदेव टेंबेस्वामींचे शिष्य होते. १९१४-१५ मध्यें बंगालमधील लोकनाथतीर्थांनी शक्तीपात दीक्षा देऊन त्यांच्यावर अनुग्रह केला. पुढे पुढे गुळवणी महाराजांनी हजारो भक्तांना शक्तीपात दीक्षा दिली. य दीक्षेने कुंडलिनी जागृत होऊन साधकाची श्रद्धा वाढते. कुंडलिनी जागृती हें साधन आहे, साध्य नव्हे असे महाराज म्हणत असत. त्यांनी मला काम काय म्हणून विचारता 'फक्त साधुसंतांचे दर्शन' असें मी उत्तर दिलें. तो दिवस आषाढी एकादशीचा होता. माझ्या हातांत त्यांचा रंगीत फोटो होता. 'त्यावर स्वाक्षरी करून मिळावी,' असें मी त्यांना सुचवितांच त्यांनी लगेच आपली स्वाक्षरी केली. मी तो फोटो तांबोसे (गोवा) येथे देव्हाऱ्याकडे ठेवला. आई तेथेच होती.

## कणकवली येथील योगेश्वर श्री भालचंद्र महाराज यांच्या सान्निध्यांत

१९५४ साली मी कणकवली येथे शिक्षक होतो. वेलकम् मेडिकल स्टोअर्सचे मालक श्री. ओरोसकर यांचे घरी माझे वास्तव्य होते. त्यांच्या घरी व इतर काहीं दुकानांतून तुरळकपणे भालचंद्र महाराजांचे फोटो फ्रेम करून लावलेले दिसत असत. श्री. ओरोसकर यांच्या घरातूनही महाराजांच्या चमत्काराबद्दल चर्चा होत असे. स्वाभाविकपणे महाराजांचे दर्शन घ्यावे म्हणून मीही कणकवली येथील रामेश्वरमंदिराच्या दिशेने संध्याकाळी ५-५।। च्या दरम्यान निघालो. मंदिरासमोर आज जो मठ दिसतो तो त्याकाळी नव्हता. मंदिराच्या प्रवेश दरवाजाकडे जाऊन पोहोचताच धूप, अगरबत्ती, कापूर यांच्या सुवासाने मंदिराचा गाभारा दरवळून गेलेला आढळला. मधून मधून भाविकांची ये-जा सुरू होती. भालचंद्र महाराज (त्यावेळी त्यांना नागडे महाराज असे म्हणत) पहावयास मिळणार म्हणून अधीरतेने गाभाऱ्याच्या आत क्षणार्धात पोहोचलो. आजूबाजूला पाहिले तर कोठेही महाराज दिसेनात. चौकशी केली तेव्हा समजले की शेजारच्या धर्मशाळेत ते असतात. देवदर्शन

घेऊन झाल्यानंतर धर्मशाळेत जाऊन पोहोचताच ''महाराज त्या खोलीत असतात'' असे एका भाविकाने भक्तिभावाने अंगुलीनिर्देश करून सांगितले.

## 'शिवोऽहम्' चा साक्षात्कार

खोली काळोखी होती. एका छोट्या चौकोनी खिडकीच्या झरोक्यातून येणारा अंधुक प्रकाश नसता तर ती अंधारकोठडीच वाटली असती. अंधुक प्रकाशात मला भालचंद्र महाराजांचे दर्शन झाले. मान खाली होती. दाढी व डोकीवरचे केस वाढले होते. मांडी पसरट होती. दोन्ही हातांची बोटे एकमेकांत असलेले हात मांडीच्या पोकळ भागात बेंबीखाली होते. मी नमस्कार केला व मागे वळून निघावे या विचारात असताना मी कोठे आहे हेच मला क्षणभर कळेना. खाली बसल्याशिवाय गत्यंतर नव्हते असे आढळतांच तेथेच बसलो. माझ्या अस्तित्त्वाची शुद्ध जाणीव सोडली तर या अस्तित्त्वाची उपाधि 'माझा देह' कोठे आहे तेच मला कळेना. अशा अवस्थेत काही वेळ जाताच स्थूल जाणीवेच्या कक्षेत देह आकार घेत आहे याची अनुभूति येऊ लागली. बेंबीच्या देठांतून 'ध्वनीचा एक तरंग' हृदय, कंठ व ओठ या मार्गाने बाहेर पडू पहात आहे याची अस्पष्ट कल्पना आली व पूर्ण जाणीवेंत येतो न येतो तोंच 'शिवोऽहम्' चा उच्चार बाहेर पडला. आध्यात्मिक दृष्टीने हा अनुभव 'स्वरूपदर्शनाचा' होता हे त्यावेळी मला आकलन झाले नाही. मला हा सर्वच प्रकार नवीन असल्याने भीतीदायक वाटला. घामाने मी चिंब झालो. केव्हा एकदा तेथून निघतो असे वाटून गेले. भालचंद्र महाराजांना पुन्हा नमस्कार करून ओरोसकर मास्तरांच्या घरी परतलो.

## कासवीचा पान्हा

१९६८ मध्ये मला शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून प्रमोशन मिळून कणकवली पंचायत समितीमध्यें शिक्षण विभागात माझी नेमणूक झाली. रात्रौ दहाची वेळ होती. रस्त्यातच श्री. मालुसरे बी. डी. ओ. यांची भेट झाली. 'चला, फिरावयास जाऊ' असे त्यांनी सुचविताच त्यांच्या-

बरोबर मी निघालो. बाजारच्या अरुंद रस्त्यातून पुढे जाताच डावीकडे वळलो, निरव शांतता होती. रामेश्वर मंदिरात जाऊन पोहोचताच समोरील मठ व तेथील वातावरण गेल्या तेराचौदा वर्षात मी न पाहिल्याने सर्व काही नवीनच होते. श्री भालचंद्र महाराजांच्या स्वरूपातहि फार बदल झालेला आढळला. वाढलेली दाढी नव्हती. केसांच्या जटा नव्हत्या. डोकीचा भाग तुळतुळीत व तुकतुकीत होता. आरक्त वर्णाच्या भालप्रदेशावर गंधाचे आडवे तीन पट्टे शोभायमान दिसत होते. पूर्वीच्या बैठकीतहि बदल झालेला आढळला. मात्र पूर्वीप्रमाणे ते मौनातच दिसले. मस्तक खाली कललेले होते. श्री. मालुसरे यांनी आपले मस्तक त्यांच्या पावलावर ठेवले. त्यांचे अनुकरण करून मी शेजारच्या बैठकीवर बसलो. मस्तक खाली असले तरी महाराज माझ्याकडे मधून मधून पहात असल्याचे मला आढळले. त्यांच्या दृष्टीत करुणा होती. ती नज् म्हणजे कासवीचा पान्हाच होता. तेथे असलेल्या मुदतीत भालचंद्र महाराजांच्या मठांत वारंवार मला जावेसे वाटू लागले. दोनतीन दिवसांनी माझी त्यांची भेट होत असे. पूर्वीची भीती नष्ट झाली.

## जुनाट दुखण्याला पूर्णविराम

१९७२-७३ च्या दरम्यान मी देवगडला होतो. बांधकाम खात्यातील श्री. जमादार नावाचे ओव्हर्सीअर व मी देवगड सावंतवाडी गाडीतून निघालो. सदर गाडी ठरलेल्या वेळेपूर्वीच कणकवली स्टँडवर येऊन पोहोचली. अर्थात अर्धा तास गाडी कणकवलीत थांबणार होती. तेवढ्या वेळांत महाराजांचे दर्शन घेऊन यावयाचे असे मी ठरविले व श्री. जमादारांना सोबत घेतले. वेळीच परतता यावे म्हणून टॅक्सी ठरविली. मठाकडे गाडी पोहोचल्यानंतर महाराजांचे दर्शन घेतले. तेवढ्यात धर्मराज (महाराजांचे शिष्य) म्हणाले, 'महाराज आपल्या बैठकीवर आत बसले होते. तुम्हाला पाहून हातापायाने पुढे सरकत ते आले. ते गाडीकडे मधून मधून पाहून गाडीतून फिरविण्यासंबंधी सुचवीत आहेत.' जमादारांचे व माझे महत्त्वाचे कागदपत्र एस. टी. मध्ये होते. जमादार थांबावयास तयार होईनात. माझी तर सत्त्वपरीक्षाच होती. महाराजांचे दर्शन घेण्यासाठी मी मुद्दाम आलो होतो व आता तर महाराज आमच्यासोबत यावयास निघाले होते. धर्मराजांनी आपल्या पाठीवरून त्यांना गाडीत बसविले. एका बाजूला धर्मराज व दुसऱ्या बाजूला मी

बसलो. महाराजांच्या डाव्या हाताला माझा उजवा हात खांद्यापासून कोपरापर्यंत बिलगलेला होता. श्री. जमादार पुढे बसले. एक फेरी मारून गाडी मठाकडे आली तरी महाराज गाडीतून उतरेनात. दुसऱ्या फेरीस सुरुवात झाली. एस्. टी. पकडण्यासाठी जमादार मध्येच उतरले व निघून गेले.

मी मात्र महाराजांना मठात पोहोचवून एस. टी. स्टँडकडे निघालो. जमादारांनाही एस. टी. चुकली होती असे एका मित्राकडून समजले. महत्त्वाची कागदपत्रे मला मागाहून मिळाली. तो साग्रसंगीत इतिहास मी विस्तारभयास्तव लिहीत नाही. गेली १९-२० वर्षे माझा उजवा खांदा मधून मधून अतिशय दुखत असे. इंजेक्शन्स, गोळ्या घेतल्या. मुंबईला जाऊन लाईट घ्यावी लागेल, असा सल्ला बऱ्याच डॉक्टरांनी दिला होता. महाराजांच्या. सान्निध्यात टॅक्सीमध्ये बसण्याची जी संधि मिळाली त्याचे फलित म्हणजे अध्यात्मातील विज्ञानाने माझी खांदेदुखी कायमची घालविली.

## माऊलीच्या मनाचा हळुवारपणा

एक दिवस मी व सर्व शिक्षणविस्तार अधिकारी रत्नागिरीस सभेसाठी जावयाचे होतो. आधल्या दिवशी श्रीधर अनंत केसरकरांना कणकवलीस मुक्काम करून दुसऱ्या दिवशी रत्नागिरीस जावयाचे असे सुचविले व ते कबूल झाले. महाराजांचा रात्री व पहाटेपर्यंतचा कार्यक्रम कसा असतो हे जवळून पाहता यावे असा माझा हेतु होता.

त्या दिवशी देवळांत वार्षिक उत्सव होता. शिवाय मठांत महाराजांसमोर खास भजन होते. भजन संपत आले व 'हेची दान देगा देवा...' म्हणावयास सुरुवात होताच महाराज ताडकन उठून बसले. त्यांची नजर एकटक आरतीतील निरांजनाकडे होती. 'घालीन लोटांगण' संपल्यानंतर एका भक्ताने त्यांना सिगारेट दिली. एक झुरका मारून होतो न होतो तोच एका भगिनीने आपल्या तान्ह्या बालकाला महाराजांच्या पुढ्यात नेले. महाराजांची जळती सिगारेट हळुवार हाताने बालकाच्या गालाला लावून झटकन वर उचलली. गुरुमाऊलीच्या मनाचा हळुवारपणा दर्शविणारी ही घटना होती. मूल रडले तरी महाराजांनी बाळाला तीट लावताच मातेचे हृदय आनंदाने उचंबळून गेले. विवेक व वैराग्य यांचा समन्वय महाराजांच्या ठायी होता.

### महाराजांचे मौन

महाराजांचे मौन म्हणजे काष्टमौन नव्हते. महाराज कधी कधं खुणेने बोलत, कधी कधी अस्पष्ट उच्चारात आपले भाव व्यक्त करीत केव्हा केव्हा कृपादृष्टीने आपले विचार संक्रमित करत असत सावंतवाडी तालुक्यातील मोरगावचे दत्तभक्त श्री. नरहरी आजगांवक मला म्हणाले की, १९१३ साली त्यांची श्री भालचंद्र महाराजांशी भेट झाली असता सर्व प्रश्नांची उत्तरे महाराजांनी तुकोबाच्या अभंगातून दिली. श्री भालचंद्र महाराज आत्मयोगी होते. ते योगेश्वर होते.

## दत्तभक्त श्री काका खानोलकर

खानोलकर (साळगांव) यांचे नाव वामन विष्णू खानोलक.. दत्तगिरीच्या मठापासून थोड्या अंतरावर हे राहतात. लहानपणापासून 'दत्तगुरू'चें नामस्मरण करतात. गुरुचरित्राचीं त्यांनी अनेक पारायणें केली. दाभोली मठाचे श्रीविमलानंद स्वामी, श्री टेंबे स्वामी यांची त्यांना भेट झाली होती. मधून मधून ते आमच्या बिऱ्हाडी येत अस... मुक्कामालाही रहात. ते साक्षात्कारी होते. आज त्यांचे वय शंभरीच्या पलीकडे गेले आहे.

## श्री तुकाराम कासकर, तांबोसे (गोवा)

एक लंगोटी व डोक्याला मुंडासें बांधून डाव्या खांद्यावर कांबळे ठेवून तुकोबांचे अभंग म्हणणारे श्री तुकाराम कासकर यांना कोण विसरेल? जेथे कीर्तन-भजन तेथे तुकाराम कासकर असावयाचेच हे ठरलेलें. नेहमी फुलें गोळा करण्यासाठी कासकर आमच्या आजोळच्या घरी यावयाचे.

पंढरीच्या विठोबांचे गुणगान करावयाचे व सद्‌गुरु, तू भाग्यवान आहेस असे सांगून जावयाचे. कातीव सावळा रंग असलेली तुकाराम कासकर यांची प्रतिमा माझ्यासमोर कायम उभी आहे.

## स्वामी अमलानंद (रायगड)

सावंतवाडीस ते आले असतांना डॉ. श्रीपाद कशाळीकर यांनी

|रोप पाठविला. प्रत्यक्ष भेट व परमार्थावर भाष्य हें पाहून कोणीही |भावित होईल असें त्यांचे व्यक्तिमत्त्व होतें. मधून मधून त्यांची पत्रें |त. ते स्वामी स्वरूपानंद यांचे शिष्य होते.

## गुरुदेव काटेस्वामी

एक दिवस माझ्या जन्मदिवशी (१९८६-८७) साल असेल; स्नान |आटोपून सावंतवाडीच्या विठ्ठल मंदिरांत विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघालों. |दर्शन घेतलें व परतणार इतक्यांत राजाराम पाटकर यांनी "सद्गुरु, |कोणी काटेस्वामी बाजूच्या धर्मशाळेंत आहेत" म्हणून सांगितले. सहज दर्शन घ्यावें म्हणून धर्मशाळेंत गेलों व कठड्यावर बसलों. डावीकडील खोली बंद होती. आंत श्रीकाटेस्वामी असल्याचे समजले. बाहेरच्या पडवींत त्यांचा शिष्य बसून धुनी पेटवत होता. १०-१५ मिनिटांनी महाराज आले व त्यांनी धार्मिक कार्य आटोपून आंत गेले. त्यांनी भगवे वस्त्र धारण केले होते. रंगाने सावळे होते. पांच मिनिटांत मला आंत बोलाविण्यांत आलें. त्यांच्या शिष्यानें मला महाराजांसमोर बसविले. माझ्या डोळ्यांवरचा चष्मा शिष्याने बाजूला केला. एका तबकांत मूर्ती होत्या. त्यांवर अभिषेक सुरू ठेवला. शिष्यानें मला डोळे बंद करण्यास सांगितलें. महाराजांनी आपलें बोट माझ्या नासिकाग्रावर आज्ञाचक्रांत ठेवून पांच मिनिटें त्यांनी मूर्तीवरील अभिषेक सुरू केला. नंतर नामस्मरणाबाबत जो मंत्र देण्यांत आला तो म्हणजे मी बालपणापासून जपलेला 'श्रीराम' हा मंत्र होता. मला फार आश्चर्य वाटलें. आजपर्यंत अनेक संत साधुपुरुषश्रेष्ठांना मला भेटण्याचा योग आला. पण कुणाकडेच दीक्षा घेण्याची मला प्रेरणा झाली नाहीं. फक्त संतांचे दर्शन घेतले. गुरूदेव काटेस्वामी यांनी मला दीक्षा देऊन टाकली.

■ □ ■ □ ■

# नामस्मरणाचें महत्त्व

प्रापंचिक माणसाला नामस्मरणासारखे दुसरे सोपें परमार्थ साधन नाहीं. नामस्मरणाला वेळेचे बंधन नाही. ते केव्हाही घेतले तरी चालते.

*चालतां, बोलतां धंदा करितां.*
*खाता, जेविता, सुखी होतां*
*नाना उपभोग उपभोगितां*
*नाम विसरों नये.....* — *रामदास*

नामस्मरणाचा मला चांगला अनुभव आला आहे. त्याची वाच्यता केल्यास बऱ्याच जणांना पटणारही नाहीं. तथापि या लेखांत ओघा-ओघाने काही भाग येईल

वेदांत देवाचे चारु नाम गाणारे कित्येक मंत्र आहेत. वेदांचे प्राचीनत्व लक्षांत घेतल्यास नामाचा महिमा किती जुन्या काळापासून सुरू झाला आहे हें कळून येईल.

*'मर्ता अमर्तस्य ते भूरिः नाम मनामहे ।*
*विप्रासो जात वेदसः ॥*

वरील वेदोक्तींत आम्ही देवाच्या विशाल नामाचें 'मनन' करतों असा उल्लेख आहे. प्रस्तुतच्या वेदोक्तींत नामाच्या मननाचा उल्लेख आहे. उच्चारणाचा नव्हे. विनोबांचे हे विधान लक्षांत घेण्याजोगे आहे. विनोबा पुढे म्हणतात.

"नाम शब्द 'नम्' धातुपासून झालेला आहे. त्यापासूनच 'नम्र' व 'नमस्कार' शब्द साधलेले आहेत."

नामाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. तत्संबंधीची उदाहरणे पुष्कळ असून संतांनी ते महत्त्व वारंवार सांगितले आहे. जगांतील सर्व भक्तिपंथांत ईश्वराच्या कोणत्याही नावाचें उच्चारण, स्मरण, कीर्तन हे भक्तीचें सर्वश्रेष्ठ साधन मानले आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, मुक्ताबाई, गोरा कुंभार, सावता माळी यांनी नामाचा

गजर करून महाराष्ट्रांत भक्तीचा मळा पिकविला. मनाला शांती मिळवून देणारें नामासारखे दुसरें साधन नाहीं. नामस्मरणातून कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें.

*स्मरण देवाचें करावें*
*अखंड नाम जपत जावें*
*नामस्मरणें पावावें*
*समाधान....* (रामदास)

नामस्मरण करणाऱ्या भक्ताच्या आचरणांत, वागण्यांत, बोलण्यांत अनुकूल बदल होतो. व्यवहारांत, कोणत्याही कामांत तो प्रामाणिकपणें वागतो. वृत्तीबदल होतो. सहज प्रवृत्तींचे उन्नयन होतें. त्याच्या वागण्यांतील दोष कमी कमी होत जातात.

*नाम स्मरे निरंतर*
*तें जाणावें पुण्य शरीर*
*महादोषांचे गिरीवर*
*रामनामें नासती* (रामदास)

नामस्मरणांतून एकाग्रता, एकाग्रतेंतून समग्रता व पुढे स्वरूपज्ञान होऊं शकतें. स्वरूपाला अद्वैत स्वरूपांत पाहणें शक्य होतें व या सर्व घटना एकांतून दुसरी व दुसरींतून तिसरी या क्रमाने घडत जातात. मूल होणे, त्याच्या पान्ह्याची व्यवस्था होणें, आईच्या वात्सल्याच्या छायेखाली वाढ होणें व त्यांतून पुढे त्याचा विकास होणे या घटना जशा घडत असतात तसा कांहीसा हा प्रकार असतो. मात्र नामस्मरणापासून होणारा विकास अंतर्यामापासून सुरू होतो व सार्वत्रिक होऊन विश्वव्यापक बनतो.

'ॐ तत् सत्' हें परब्रह्माचें नांव होय. ते घेऊन सात्त्विक कर्मे केलीं तर त्या कर्मास मोक्षापर्यंत नेण्याचें सामर्थ्य या नावात आहे. संसारतापानें पिडलेल्या लोकांना दु:खातून सोडविण्यासाठीं व जीवाला ब्रह्मप्राप्ती करून देण्यासाठी श्रुती माऊलीने हे नांव ठेविले.

*'म्हणौनि ब्रह्म नाम श्रद्धा ।*
*सांडुनि कीजे जो धंदा ।*

*हे असु शिपु नुसधा ।*
*दृष्टा दृष्टी तो ।.... ज्ञानेश्वरी अध्याय १७ ओवी ४२*

ब्रह्मदेवाला सृष्टी निर्माण करण्याचें सामर्थ्य नव्हतें. नामाच्या अर्थाचे अंतःकरणांत चिंतन केल्यामुळें व नामाच्या तीन शब्दांचा जप केल्यामुळें त्याला सृष्टी निर्माण करण्याची योग्यता आली.

*'जयाचा अर्थु जीवी ध्यातां*
*जे वर्ण त्रयची जपतां*
*विश्वसृजन योग्यता*
*आली तया ॥ ३३८ ज्ञानेश्वरी अ. १७*

मी कोठेही नसलों तरी माझे भक्त जेथें माझा नामघोष करत त्यांच्यापाशी अर्जुना मला शोधावा.

*परि तयांपाशी पांडवा । मी हारपला गिवसावा ।*
*जेथे नामघोषु बरवा । करिती ते माझें ॥*
*अ.९ : १०८*

नामस्मरणाच्या बाबतींत माझा अनुभव सांगणे जरूर आहे. १९४८ पासून नामस्मरणाची आवड निर्माण झाली. संपूर्ण दिवस नित्याची कामे करता करतां नामस्मरण सुरू राहूं लागले. रात्रौ झोपेपर्यंत अखंड नामस्मरण सुरू असे. कोणी चर्चा करावयास आला तरी आंतून अखंड नामाचा झरा वाहत असे. निरनिराळ्या देवतांची दर्शनें होऊं लागली. त्यांच्याकडे कोणतेच मागणें घडलें नाही.

रात्रौ कोणत्याही वेळीं सुगंध दरवळूं लागे. कोणतेंही काम करतांना सोबत नामी आहे अशी भावना होऊं लागली. बाहेर जातानाही सोबत देवता मागे-पुढे आहेत अशी जाणीव होऊं लागली. अनिर्वाच्य आनंदांत दिवस जाऊ लागले. माझी सर्व प्रकारची भीती गेली. सर्व ठिकाणीं भगवंत भरून उरला आहे असें वाटू लागलें. नामस्मरणाची गोडी इतकी लागली की तो माझा छंदच होऊन बसला.

नोकरींत अधिकारी म्हणून काम करतांना बारा ते पंधरा त काम करूनहि (या कामांत फिरती व शाळांना भेटी तसेंच कार्यालयांत वरिष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी म्हणून जबाबदारींचे काम) थकवा येत नसे. भ्रष्टाचार व इतर व्यसने यांपासून परमेश्वरानें मला दूर ठेवलें

होतें. वेळेबरहुकूम माझी सर्व कामें होऊं लागली. अनेक समस्या निर्माण झाल्या; परंतु त्या समजून घेण्याची व स्थिर बुद्धि नामस्मरणामुळेंच मला प्राप्त झाली. मी एकटा नाहीं. माझ्या साहाय्याला परमेश्वर आहे याची मला खात्री होती व तशी मला प्रचीतिहि आली होती. प्रवासांत वाहनांतील तीस-पस्तीस व्यक्ती अपघातानें जखमी झालेल्या असतांना मी अलगद जरा सुद्धा न खरचटतां सुटलों. चार-चार तासांची ऑपरेशन झाली. पुरेपूर निर्भयता कायम होती. विविध आजारांचे ओझें खांद्यावर घेऊन माझें जीवन व्यतित होत होतें. सोबत नामस्मरणाची जोड होती. नामस्मरणांत निरामय आनंद असतो. आनंद म्हणजे आनंदच. त्याला सुखदुःखासारखी विरोधी बाजू नसते.

डोंबिवली मुक्कामीं मी रस्त्यावर ठेंच लागून पडलों. जवळच 'माझें वाचनालय' होतें. माझ्या हातांत 'भक्तीच्या वाटा' हें पुस्तक होतें. तें बदलून दुसरें घेण्यासाठीं मी चाललों होतों. मला उठतां येईना. वरील ओठाला व डोळ्याखाली जखमा होऊन भळभळा रक्त वाहत होतें. एका मिनिटांत एक ॲम्बॅसडर गाडी येऊन पोहोचली. त्यांतून दोन व्यक्ती खाली उतरल्या. जवळच असलेल्या बोअरींग विहिरींतून त्यांनी पाणी काढून माझें तोंड धुतलें. आपल्या हातरुमालानें तेवढा भाग पुसून त्यांनी मला डोंबिवली पश्चिममधील एका हॉस्पिटलमध्यें नेऊन ऑपरेशन टेबलावर झोपविले. इंजेक्शनें दिलीं. टाके घातले. ड्रेसींग केले. गाडींतून मला डोंबिवली पूर्व मध्ये माझ्या निवासस्थानीं पाठविलें. डोंबिवलीचे एक देवभक्त डॉ. उपासनी ते होते. आज मला भक्तीची एक नवीन वाट डॉ. उपासनी यांचे दिशेनें जाते याचा बोध झाला. देव आपल्या भक्तांच्या रूपानें मदतीला धावतो. नामाच्या अनुसंधानानें एकाग्रता, प्रेम, अंतःकरणाची शुद्धता, निर्विकल्प स्थिती स्वतःला विसरणें वगैरे दृष्टीने साधकांत पुष्कळ बदल होतो. जीवाची कल्पना, करणाऱ्याला जग दिसतें. जग छळतें. नामस्मरणाने नामधारक निर्भय होतो. 'मी' पणा नाहींसा होतो. तो जीवनमुक्तीच्या मार्गावर असतो.

नोव्हेंबर १९९० ची ही गोष्ट मला (देहाला) सतत तीन महिने खोकला व दमा यांचा त्रास झाला. रात्र रात्र जागा राहून व बसून दिवस काढले. रक्ताच्या दोन उलट्या झाल्या. रविवार होता. सोमवारी मुलांनी मला 'जसलोक' हॉस्पिटल मध्यें दाखल केलें. तपासणीच्या दृष्टीनें कांही चाचण्या सुरू होत्या. गुरुवारी रात्री अर्धवट जागृतावस्थेंत

सर्वत्र प्रकाशानें भरलेले अंतराळ दिसले. दृश्य सृष्टीपैकी. काहीही दिसेना. देहाशिवायच 'मी' होतों. तारे, सूर्य यांचे अस्तित्व लुप्त झालें होतें. फक्त निरामय जाणीवेशिवाय काहींच नव्हतें. मात्र प्रश्न विचारले जात होतें. उत्तरेहि मिळत होती. प्रश्न कोण विचारतो? उत्तरें कोण देतो? काहीच कळेना! मूळ स्वरूपाच्या जाणीवेची ही चुणुक होती काय? स्वरूपदर्शनाच्या वाटेवरील हा एक टप्पा असेल काय? देह नसलेला मी विरघळत होतो. प्रकाशानें मला संपूर्णपणे आपल्या पोटांत घेतलें होतें. मी प्रकाशरूप झालों होतों. स्वतःचे अस्तित्व शिल्लक राहिलें नाहीं. सकाळ झाली. आठ वाजले. तोपर्यंत दोन-तीन खेपा टाकून नर्स डॉक्टरना बोलावण्याकरिता गेल्या. डॉक्टरांनी गदगदा हालवून जागा केला. मी आनंदाने बेहोष झालेल्या स्थितीत असताना मला जागा केला नसता तर बरें झाले असतें. डॉक्टर माझा उत्साही चेहरा पाहून आश्चर्यचकित झाले. पुढे वीस नोव्हेंबरपर्यंत अनेक तपासण्या झाल्या. एकवीस नोव्हेंबर १९९० रोजी 'पेशंट ठीक आहे' असें सांगून मला डिस्चार्ज दिला.

भक्त होऊन राहणें म्हणजे एकरूप होणें. जीवपणा गेला की शिवपणा येतो. नामस्मरणानें भक्त मृत्युजवळ जात नाही. तो मुक्तीकडे जातो. व्यवहारात मात्र माणसे म्हणतात, 'त्याचें निधन झालें!'

रुद्राक्षयात्रेनें नाम दिलें. काम दिलें. प्रपंच झाला. अखंड नामस्मरण आजही सुरू आहे. कोणतीहि अपेक्षा केव्हाच नव्हती. आजही नाही. कारण अंतर्यामीच्या आनंदांत कोणतेच मागणें शिल्लक राहिले नाहीं. आजहि तीच स्थिति आहे.